सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ५ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# जगातील सर्वात मोठा १६ हजार मेगावॅटचा विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प

## शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज पुरवठ्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ वाशिम**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात उभारण्यात येणाऱ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या पाच सोलर पार्कचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी येथे करण्यात आले.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय पंचायत राजमंत्री राजीव रंजन ऊर्फ ललन सिंह, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, जलसंधारणमंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड व कृषीमंत्री धनंजय मुंडे यावेळी उपस्थित होते.

कृषी फीडर्सना सौर ऊर्जेद्वारे निर्माण केलेल्या विजेचा पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान अर्थात पीएम कुसुम योजनेच्या आधारे राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये ९२०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरू असून ते टप्प्या टप्प्याने सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार आहे. त्यापैकी धोंदलगाव (जिल्हा छत्रपती संभाजीनगर), बामणी बुद्रक (जिल्हा नांदेड), हरोली (जिल्हा कोल्हापूर), जलालाबाद (जिल्हा अकोला), पलशी बुद्रुक (जिल्हा बुलढाणा) या एकूण १९ मेगावॅट क्षमतेच्या पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण आज झाले. सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीस मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना मा. पंतप्रधानांच्या हस्ते २०.५५ कोटी रुपये विकासनिधी ऑनलाईन पद्धतीने देण्यात आला.

याखेरीज ४८०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीसाठी टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सर्व प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होऊन राज्यात शेतीसाठी पूर्णपणे सौर ऊर्जेवर निर्माण झालेल्या विजेचा पुरवठा होईल. या योजनेत एकाच हेतूने राज्यात विविध ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून अशा विकेंद्रित



स्वरुपातील हा जगातील सर्वात मोठा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. योजनेच्या अनुषंगाने राज्यात शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वीजनिर्मिती कंपनी स्थापन करण्यात आली आहे.

राज्य सरकारने एप्रिल २०२३ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ला मंजुरी दिल्यानंतर राज्याचा ऊर्जा विभाग आणि महावितरणने केवळ अकरा महिन्यात ४० हजार एकर सार्वजनिक जमीन उपलब्ध करणे, सौर ऊर्जा निर्मितीसाठीची टेंडर प्रक्रिया पूर्ण करणे, वीज खरेदीचे करार करणे, वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे आणि विकसकांना ९२०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मितीची लेटर ऑफ वॉर्ड देणे ही कामे केली. विकसकांना आदेश दिल्यानंतर केवळ सहा महिन्यात त्यापैकी १९ मेगावॅट क्षमतेचे पाच प्रकल्प सुरू झाले. या प्रकल्पांचे लोकार्पण मा. पंतप्रधानांच्या हस्ते आज झाले.

शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी सध्या दिवसा व रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा करण्यात येतो. केवळ दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करावा अशी त्यांची मागणी आहे. पीएम कुसुम अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होणार आहे. या योजनेत सौर ऊर्जा निर्मितीसाठी दरवर्षी सव्वा लाख रुपये प्रती हेक्टर दराने जमीन भाड्याने देण्याचीही सुविधा शेतकऱ्यांसाठी आहे.

या योजनेमध्ये खासगी गुंतवणूकदारांकडून एकूण ६५ हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार असून ग्रामीण भागात ५० हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. सध्याच्या साडे आठ रुपये प्रती युनिट दराच्या ऐवजी सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या किफायतशीर दराने वीज उपलब्ध होणार असल्याने वीज खरेदीमध्ये दरवर्षी १० हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी राज्य सरकारवरील वार्षिक ४५०० कोटी रुपये अनुदानाचा व उद्योगांवरील वार्षिक १३ हजार कोटी रुपयांचा क्रॉस सबसिडीचा बोजा दूर होईल. तसेच हरित ऊर्जेचा वापर केल्यामुळे पर्यावरण रक्षणाला मदत होईल.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा काँग्रेसवर घणाघात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाशिममध्ये बोलताना काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. काँग्रेसला फक्त लुटणं माहीत आहे. गरिबांना गरीब ठेवायचं आहे. त्यामुळे तुम्ही सर्वजण काँग्रेसपासून सावध राहा असं म्हणत मोदींनी निशाणा साधला आहे. तसेच दिल्लीमध्ये हजारो कोटी रुपयांचे ड्रग्ज पकडले. दु:खद गोष्ट म्हणजे त्याचा म्होरक्या काँग्रेसचा नेता निघाला. काँग्रेस तरुणांना नशेत ढकलत आहे असं सांगत मोदींनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडलं आहे. काँग्रेसला फक्त लुटणं माहीत आहे. गरिबांना गरीब ठेवायचं आहे. त्यामुळे तुम्ही सर्वजण काँग्रेसपासून सावध राहा. अर्बन नक्षल काँग्रेसला चालवत आहे. काँग्रेसला देशाचे तुकडे करायचे आहेत. त्यामुळे ते आपल्यात फूट पाडू पाहत आहे. त्यामुळे एक व्हा. ही वेळ एकत्र राहण्याची आहे. आपली एकताच समाजाला वाचवेल. महाराष्ट्रातील लोकांना काँग्रेसचा आणखी एक कारनामा सांगायचा आहे. तुम्ही बातम्यांमध्ये पाहिलं असेल. दिल्लीमध्ये हजारो कोटी रुपयांचं ड्रग्ज पकडलं. दु:खद गोष्ट म्हणजे त्याचा म्होरक्या काँग्रेसचा नेता निघाला.असे मोदी म्हणाले

# राजकोट किल्ल्यावरील शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला कारण; कोल्हापुरातील सभेतून राहुल गांधींचा भाजपावर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५कोल्हापूर**

भाजपाने राजकोट किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला. मात्र, काही दिवसांतच तो पुतळा कोसळला, कारण भाजपा सरकारची नियत खराब होती, अशी टीका लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. तसेच भाजपाचे लोक सकाळी उठतात आणि शिवाजी महाराजांच्या विचारांचं संविधान कसं संपायचं यासाठी प्रयत्न करतात, असेही ते म्हणाले. कोल्हपूरमध्ये आज राहुल गांधी यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. यावेळी बोलताना त्यांनी भाजपावर जोरदार टीका केली.

**नेमंक काय म्हणाले राहुल गांधी?**

आज आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी इथे जमलो आहोत. हा केवळ एक पुतळा नाही. तर एक विचार आहे. पुतळा तेव्हाच बनवला जातो, जेव्हा आपण त्या व्यक्तीच्या विचारांचा आदर करतो. छत्रपती शिवाजी महाराज आयुष्यभर ज्या विचारांसाठी लढले, तोच विचार आपण पुढे घेऊन जाणार नसू तर आज या पुतळ्याच्या अनावरणाचा काहीही अर्थ राहणार नाही, अशी प्रतिक्रिया



राहुल गांधी यांनी दिली.शिवाजी महाराजांनी आपल्याला संदेश दिला, की हा देश सर्वांचा आहे. इथे कोणावरही अन्याय होता कामा नये. त्याच विचारांचं प्रतिबंध आज आपल्याला संविधानात दिसून येत आहे. त्यांच्या विचारांचा आणि संविधानाचा थेट संबंध आहे. संविधानात अशी एकही तरतूद नाही, जी शिवाजी महाराजांच्या विचारातून आलेली नाही. त्यांच्या विचारातून संविधानाची निर्मिती झाली आहे. शिवाजी महाराज आणि शाहू महाराजांसारखी लोक जन्माला आली नसती, तर आपलं संविधानही नसतं. भारतात सध्या दोन विचारधारांची लढाई सुरू आहे. एक विचारधारा जी संविधानाचं तसेच समानतेचं रक्षण करते आहे. तर दुसरी विचारधारा संविधान संपवण्याचा प्रयत्न करते आहे, असंही राहुल गांधी म्हणाले.

पुढे बोलताना ते म्हणाले, ज्यावेळी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होणार होता, तेव्हा भाजपाच्या विचारधारेच्या लोकांनी त्यांचा राज्याभिषेक होऊ नये, यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे आज सुरु असलेली विचारधारेची लढाई ही खूप जुनी आहे. या विचारधारेविरोधात शिवाजी महाराजदेखील लढले होते आणि आता याच विचारधारेच्या विरोधात काँग्रेस पक्षही लढतो आहे. ज्याप्रकारे या लोकांनी शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला विरोध केला, त्याप्रमाणे आताच्या सत्ताधाऱ्यांनी संसदेच्या उद्घाटनाला आदिवासी राष्ट्रपती असलेल्या द्रौपदी मुर्मू यांना बोलवलं नाही, असंही त्यांनी नमूद केलं.पुढे बोलताना त्यांनी भाजपालाही लक्ष्य केलं. भाजपाचे लोक सकाळी उठतात आणि शिवाजी महाराजांच्या विचारांचं संविधान कसं संपायचं यासाठी प्रयत्न करतात. भाजपाचे लोक भारतातील विविध संस्थांवर आक्रमण करतात. लोकांना घाबरतात आणि इतकं करूनही परत शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होतात. याला काहीही अर्थ नाही. जर तुम्ही शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर तर नतमस्त होत असाल, तर तुम्हाला संविधानाचे रक्षण करावंच लागेल, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस,अजित पवार यांनी केली बेलोरा विमानतळाची पाहणी





## तातडीने काम पूर्ण करण्याचे दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

अमरावती बेलोरा विमानतळाची उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अजितदादा पवार, यांनी आज संपूर्ण विमानतळाची पाहणी केली व अधिकाऱ्यांना अर्धवट असलेले काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिलेत. अमरावती बेलोरा विमानतळ भूमिपूजन,उदघाटन दिवाळीच्या शुभ पर्वावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन होणार असून लवकरच अमरावती करांना बेलोरा विमानतळावरून ७२ सीटर विमान उडणार आहे

आज वाशीम येथे एका कार्यक्रमात जाण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, अजित पवार हे अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर उतरले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना येण्यासाठी थोडा वेळ असल्याने देवेंद्र फडवणीस, अजित पवार यांनी बेलोरा विमानतळाच्या कामाची पाहणी केली. बडनेरा मतदारसंघाचे आमदार रविभाऊ राणा यांनी संपूर्ण विमानतळाची माहिती यावेळी दिली या ठिकाणी टर्मिनल बिल्डिंग , रनवे ,रस्ते फॉरेस्ट इतर सर्व सोयी सुविधा इत्यादी कामासंदर्भात पाहणी केलेली व संबंधित संपूर्ण अधिकाऱ्यांना दिशा निर्देश दिले की लवकरात लवकर विमानतळाचे अर्धवट असलेले काम उद्घाटनाच्या अगोदर पूर्ण करण्यात यावे तसेच वनविभागाचे अधिकाऱ्यांना आदेश दिले की त्या ठिकाणी असलेले जनावरे यांचा सुद्धा बंदोबस्त लावून संपूर्ण परिसर जनावरांपासून खाली करण्यात यावा असे आदेश विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच विमान प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी दिले. त्याचप्रमाणे अमरावती मेडिकल कॉलेज मधील मेडिकलच्या १०० विद्यार्थ्यांचा प्रवेश प्रकीया तसेच मेडिकल कॉलेजचे भूमिपूजन हे सुद्धा होत आहे त्या अनुषंगाने सर्व अधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी निर्देश दिले की मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया त्याचप्रमाणे उद्घाटना संबंधी सोयीसुविदेबाबत उपाययोजना तातडीने करण्यात याव्या तसे आदेश विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी मेडिकल कॉलेजची डीन जिल्हा आरोग्य अधिकारी व संबंधित सर्व अधिकाऱ्यांना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी दिले. त्यानंतर काही वेळाने मुख्यमंत्री सुद्धा आपल्या चार्टट विमानाने बेलोरा विमानतळावर पोहचले व हेलिकॅप्टर मध्ये नंतर तिघे बसून वाशीम कडे रवाना झाले.

# अहमदनगर शहराचे नाव ‘अहिल्यानगर’; जिल्ह्याचे नाव राहणार तेच; सरकारी आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अहमदनगर**

अहमदनगर शहराचे नाव बदलून ते अहिल्यानगर असे करण्याबाबत राज्य शासनाने राजपत्र प्रसिद्ध केले आहे. जिल्ह्याचे नाव अहमदनगर असेच राहणार आहे. शासनाचे उपसचिव दि. ब. मोरे यांच्या






नावाने ४ ऑक्टोबर रोजी हे राजपत्र प्रकाशित झाले आहे. अहमदनगर शहराच्या नामकरणास गृह मंत्रालयाने १ ऑक्टोबर रोजी अनुमती दिली. त्यानुसार या अधिसूचनेद्वारे अहमदनगर शहराचे नाव बदलून ते 'अहिल्यानगर, तालुका व जिल्हा अहमदनगर', असे करण्यात येत आहे, असे या राजपत्रात म्हटले आहे.

असाधारण क्रमांक ११२ या क्रमांकाने हे राजपत्र प्रसिद्ध झाले आहे. या राजपत्रानुसार अहमदनगर शहराचे नाव आता अहिल्यानगर म्हणून ओळखले जाईल. मात्र जिल्ह्याचे नाव हे अहमदनगर असेच राहणार आहे. जामखेड तालुक्यातील चोंडी येथे अहिल्यादेवींच्या जयंतीदिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहमदनगरचे नामकरण करण्याची घोषणा केली होती त्यानुसार शासनाने हे राजपत्र प्रसिद्ध केले आहे.

# केंद्रीय सहकारमंत्र्यांनी दिले साखरेचा एमएसपी वाढण्याचे आश्वासन; उसाला मिळणार चांगला दर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५पुणे**

राज्यातील उसाच्या गाळप हंगामाला येणाऱ्या दीड महिन्यात सुरूवात होणार आहे. मंत्री समितीच्या बैठकीमध्ये १५ नोव्हेंबर रोजी साखर कारखाने सुरू करण्याचे एकमताने मंजूर करण्यात आले. त्यामुळे यंदा मागच्या वर्षीच्या तुलनेत १५ दिवसांनी उशिरा साखर कारखाने सुरू होणार आहेत.

साखर कारखाने सुरू होण्याआधीच राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी पुढील सात दिवसांत केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा साखरेचे एमएसपी वाढवणार असल्याचे आश्वासन दिले आहे. साखरेच्या एमएसपीमध्ये वाढ झाली तर साखर कारखान्यांना चांगला दर मिळून शेतकऱ्यांचा उसाचा चांगला दर मिळण्यास मदत होऊ शकते.केंद्र सरकारने लोकसभा निवडणुकींच्या आधीच उसाला प्रतिटन २५० रूपये हमीभावामध्ये



वाढ केली असून यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांना प्रतिटन ३ हजार ४०० रूपयांप्रमाणे दर मिळणार आहे. पण केंद्राने २०१८ सालापासून साखरेची किमान आधारभूत किंमत म्हणजेच एमएसपी वाढवला नसल्याची कारखानदारांची तक्रार होती. दरम्यान, दरवर्षी केंद्र सरकारकडून उसाच्या एफआरपीमध्ये वाढ करण्यात येते पण साखरेच्या किमान आधारभूत किंमती वाढत नसल्यामुळे साखर कारखाने अडचणीत येण्याची शक्यता आहे. यंदा आंतरराष्ट्रीय पातळीवर साखरेचे उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. चीन देशातील साखरेचे उत्पादन हे २०२४-२५ या गाळप हंगामात ६ लाख टनाने वाढण्याचा अंदाज असल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दर दबावात राहण्याची शक्यता आहे.

केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांना भेटून उसाच्या एफआरपीप्रमाणेच साखरेच्या एमएसपीमध्ये वाढ करण्याची मागणी आम्ही केली. त्यावेळी पुढील सात दिवसांत साखरेचा एमएसपी वाढवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे उसाचा चांगला दर मिळणार आहे अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. सातारा येथे जिल्हा बँकेच्या अमृतमहोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते.

# खासदार चंद्रकांत हंडोरेंच्या मुलाच्या कारची दुचाकीस्वाराला धडक, पळून गेलेल्या गणेश हांडोरेला बेड्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

शहरात आणखी एक हिट अँड रनची घटना समोर आली असून काँग्रेस खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या मुलाच्या कारने एका दुचाकीस्वाराला धडक दिल्याची घटना घडली. गणेश हंडोरे याने चेंबूर येथील आचार्य कॉलेज जवळ गोपाळ आरोटे या दुचाकीस्वाराला धडक दिली आणि तिथून पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी गणेश हंडोरेला अटक केली आहे.

काँग्रेस खासदार चंद्रकांत हंडोरे यांचे पुत्र गणेश हंडोरे याने शुक्रवारी रात्री एक दुचाकीस्वाराला धडक दिली. गणेश हा ज्यूस पिण्यासाठी गोवंडीच्या दिशेने गेला होता. मात्र परत येताना चेंबूर येथील आचार्य कॉलेज जवळ त्याने गोपाळ आरोटे या दुचाकीस्वाराला धडक दिली आणि तिथून पळ काढला.

या प्रकरणी गोवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून गणेशला अटक केली आहे. मात्र त्याची शुगर वाढल्याने त्याला जेजे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर जखमी गोपाळ आरोटेवर झेन रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी गोवंडी पोलिस पुढील तपास करीत आहेत. गणेश हंडोरेवर पोलिसांन BNS कलम ११०, १२५(र), (ल),२८१ आणि मोटर व्हेइकल अ‍ॅक्ट कलम १३४(र), (ल), १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

गणेश हंडोरेला पोलिसांनी अटक केल्यानंतर त्यांची शुगर वाढल्याचं दिसून आलं. त्यामुळे त्याला रुग्णालयात भरती केलं असून जेजे रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

## संपादकीय ......

# प्रतीक्षा करकायद्यातील सुधारणांची

मागील काळात महसूल विभागाने प्राप्तिकराच्या नियमात सुटसुटीपणा आणण्यासाठी मुख्य प्राप्तिकर आयुक्त व्ही. के. गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केली होती. ही समिती लवकरच आपला अहवाल सादर करणार आहे. प्राप्तिकर अधिनियमांना सुटसुटीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने करदात्यांची संख्यावाढ ही करव्यवस्थेला अधिक निष्पक्ष करणारी राहावी, यासाठी विशेष लक्ष द्यायला हवे. या आधारे कर भरणाच्या दृष्टिकोनाला योग्य चालना मिळेल. त्याचबरोबर प्राप्तिकर व्यवस्था सोपी करण्याच्या दृष्टीने वाटचाल करण्यासाठी रणनीती आखावी लागेल. यानुसार जीएसटीला अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक करावे लागेल.

अलीकडेच गोवा येथे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) परिषदेच्या मंत्रिगटाची बैठक पार पडली. या बैठकीत विमा हप्ता, वस्त्रोद्योग, हातमागावरच्या वस्तू, कृषीसंबंधी वस्तू आणि खतांसह शंभरपेक्षा अधिक वस्तूंवरच्या जीएसटी दरांचे विश्लेषण करण्यात आले. या दरांत बदल करण्याच्या दृष्टीने ऑक्टोबर महिन्यात नवी दिल्लीत होणार्या बैठकीत विचारविमर्श करण्याचे ठरविण्यात आले.

आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या प्रत्यक्ष कर संकलनाचे आकडे पाहिले तर प्रत्यक्ष कर संकलन १९.५८ लाख कोटी रुपये राहिले आणि ते यापूर्वीच्या आर्थिक वर्षांच्या २०२२-२३ मधील १६.६४ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत १७.७० टक्के अधिक आहे. विशेष म्हणजे गेल्या आर्थिक वर्षात २०२३-२४ च्या काळात सर्वंकष वैयक्तिक पातळीवरचे प्राप्तिकर संकलन १२.०१ लाख कोटी रुपये राहिले आणि ते मागील वर्षाच्या ९.६७ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत २४.२६ टक्के अधिक राहिले. याप्रमाणे आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी जीएसटी संकलन २०.१८ लाख कोटी रुपयांवर पोहोचलेले असताना ते मागील वर्षांच्या तुलनेत ११.७ टक्के अधिक वाढ दर्शवित आहे.

प्राप्तिकर आकलन वर्ष २०२४-२५ साठी ३१ जुलैपर्यंत प्राप्तिकर विवरण भरण्याच्या मुदतीपर्यंत विक्रमी ७.२८ कोटींपेक्षा अधिक प्राप्तिकर विवरण दाखल करण्यात आले आणि ही संख्या मागील वर्षाच्या तुलनेत ७.५ टक्के अधिक आहे. सध्याच्या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष करातून २२.०७ लाख कोटींचे संकलन करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. याप्रमाणे चालू आर्थिक वर्षात जीएसटी संकलनदेखील वेगाने वाढताना दिसते. त्याने ऑगस्ट २०२४ मध्येच दहा टक्के वाढीसह १.७५ लाख कोटी रुपयांचा आकडा पार केला आहे. खर्या अर्थाने गेल्या दहा वर्षांत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर संकलनात वाढ होण्यास अनेक महत्त्वपूर्ण आधार आहेत. प्राप्तिकर कायद्यात सुधारणा झाल्याने करदात्याला अधिक सुविधा मिळाल्या आणि प्राप्तिकरदात्यांची संख्या वाढण्यासही हातभार लागला.

प्राप्तिकरातील सुधारणांची मुहूर्तमेढ म्हणजे २५ सप्टेंबर २०२० रोजी संपूर्ण देशभरात करदात्यांसाठी लागू केलेल्या ओळखविना अपील (फेसलेस अपील) करण्याची व्यवस्था, तसेच २०१९ मध्ये लागू केलेले करदाता चार्ट (टॅक्सपेयर चार्टर) आणि ओळखीविना आढावा (फेसलेस असेसमेंट) यासारख्या मोठ्या सुधारणा प्रमुख मानता येईल. याशिवाय नॉन फायलर्स, मॉनिटरिंग सिस्टीम (एनएमए) या माध्यमातून प्राप्तिकर विवरणपत्र सादर न करणारे, परंतु उच्च व्यवहार करणार्या लोकांचा शोध घेतला जातो.

प्राप्तिकर अधिनियमांना सुटसुटीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने करदात्यांची संख्यावाढ ही करव्यवस्थेला अधिक निष्पक्ष करणारी राहावी, यासाठी विशेष लक्ष द्यायला हवे. या आधारे कर भरणाच्या दृष्टिकोनाला योग्य चालना मिळेल. त्याचबरोबर प्राप्तिकर व्यवस्था सोपी करण्याच्या दृष्टीने वाटचाल करण्यासाठी रणनीती आखावी लागेल. यानुसार जीएसटीला अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक करावे लागेल. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करत जीएसटी प्रणाली अधिकाधिक उपयुक्त केल्यास जीएसटी संकलनाला चालना मिळेल. आता पेट्रोलियम पदार्थ आणि जमीन तसेच रिअल इस्टेटलादेखील जीएसटीत आणण्याची वेळ आली आहे. एक तर महसूल उत्पन्नात वाढ होईल आणि त्याचबरोबर जमीनस्तरावर होणार्या व्यवहारांत पारदर्शकता येईल.

# महिषासुर राक्षसाशी युद्धाला जाताना देवीला कोणत्या देवतांनी कोणती शस्त्र दिली ते जाणून घ्या!

**विदर्भ प्रजासत्ताक**

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हात असतो, असे सगळेच म्हणतात. देवी शक्तीचे स्वयंभू रूप असली तरीदेखील तिला युद्धात यश मिळावं या भावनेने अनेक देवांनी आपल्याकडचे उत्तम शस्त्र देवीला बहाल केले. महिषासुरासारखे राक्षस ज्यांनी पृथ्वीवरील समस्त जीवांना त्रासले होते, त्याला आटोक्यात आणण्यासाठी विविध शस्त्रांचा अंकुश हवा. त्यासाठी संघटन शक्ति हवी. आम्ही पाठीशी आहोत हा दिलासा हवा. तोच सर्व देवतांनी मिळून देवीला देऊ केला. त्यामुळे अष्टभुजा शस्त्रसज्ज झाली आणि नवरात्रीच्या दहाव्या दिवशी विजयश्री घेऊन आली, तोच विजयोत्सव आपण दसर्याला साजरा करतो. त्यानिमित्ताने देवीला मिळालेली शस्त्र कोणती व ती कोणी दिली याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.




**१) त्रिशूळ** :देवीच्या उजव्या हातात त्रिशूळ आहे. भगवान शंकराने अंबामातेला त्रिशूल अर्पण केल्याचे सांगितले जाते.

**२) शक्ती दिव्यस्त्र** :हे शस्त्र अग्नि देवतेने आईला दिले होते. जेव्हा महिषासुर अनेक राक्षसांशी लढायला आला. तेव्हा मातेने या शस्त्राने सर्वांना हाकलून दिले.

**३) चक्र** :रक्तबीज आणि इतर अनेक राक्षसांना मारण्यासाठी मातेने चक्राचा वापर केला. भक्तांच्या रक्षणासाठी हे चक्र श्री हरी विष्णूने देवी दुर्गाला दिले होते.

**४) शंख** : पृथ्वी, आकाश आणि पाताळ या तिन्ही जगांना आपल्या नादाने कंपित करणारा शंख जेव्हा रणभूमीवर वाजवला. तेव्हा सर्व राक्षस घाबरून पळून गेले. ते भीतीने थरथरत होते. वरुण देवाने माता जगदंबेला शंख अर्पण केला.

५ -६ ) धनुष्य व बाण :युद्धभूमीवर मातेने धनुष्यबाणांनी राक्षसांच्या सैन्याचा नाश केला. धनुष्य-बाणांनी भरलेली लहर पवनदेवाने दिली.

**७) घंटा** :अनेक असुरांना आणि दैत्यांना एका तासाच्या आवाजाने बेशुद्ध करून टाकल्यानंतर, इंद्रदेवाने आपल्या वज्रापासून दुसरे वज्र उत्पन्न करून ते मातेला दिले.

**८-९) तलवार आणि भाला** :चंड-मुंड नष्ट करण्यासाठी आईने कालीचे विशाल रूप धारण केले. माहाकालने दिलेल्या तलवारी आणि कुर्‍हाडीने लढाई झाली. देवीने तलवारीने अनेक असुरांची मान कापली.

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन मेळावा उद्या

## उद्योजक गुणवंत देवपारे यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** - येथील प्रसाद मंगल कार्यालय येथे ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता स्पर्धा परीक्षा, उद्योजकता आणि कौशल्य विकास मार्गदर्शन मेळावा उद्योजक तथा पिरॅमिड ग्रुप ऑफ कंपनीचे संचालक गुणवंत देवपारे यांच्या संकल्पनेतून समाज विकास फाऊंडेशनद्वारे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून उद्योजक गुणवंत देवपारे राहणार आहेत, तर उद्घाटक म्हणून खासदार बळवंतराव वानखडे हे आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून फिनिक्स अकादमी, वर्धाचे संचालक प्रा. नितेश कराळे व प्रवीण केंदळे



उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याचा विद्यार्थी, पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सोयाबीन, ज्वारी, मका, भात या खरीप पिकांची काढणी कधी करावी? वाचा सविस्तर

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक** :खरीप हंगामातील पिकांची वेळेवर काढणी न केल्यास ती प्रमाणापेक्षा जास्त पक्व होऊन/जमिनीवर गळ होऊन पिकाचे नुकसान होते. त्यासाठी विशिष्ट लक्षणांवरून पिकांची योग्य वेळी काढणी करणे हितकारक ठरते. यात मूग, उडीद, सोयाबीन, खरीप ज्वारी, मका, भात, सूर्यफूल आदी खरीप पिकांची काढणी कधी करावी, हे या लेखातून समजून घेऊया.

**मूग व उडीद-** मुग व उडदाच्या शेंगा ७५ टक्के वाळल्यानंतर पहिली तोडणी व त्यानंतर ८ ते १० दिवसांच्या अंतराने नंतरच्या तोडण्या कराव्यात. शेंगा खळ्यावर चांगल्या वाळल्यावर काठीने झोडपून दाणे अलग करावेत.

**सोयाबीन** - सोयाबीनच्या शेंगाचा रंग पिवळट तांबूस झाल्यानंतर जातीच्या पक्वतेच्या कालावधीनुसार ९० ते ११० दिवसात काढणी करावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

सोयाबीनच्या काढणीस उशीर झाल्यास शेंगा फुटण्यास सुरुवात होते.

**भुईमूग-** भुईमुगाचे पीक काढणीसाठी तयार झाले की, त्याची पाने पिवळी पडू लागतात, शेंगाचे टरफल टणक बनते, टरफलाची आतील बाजू काळी दिसते, अशा प्रकारची लक्षणे दिसताच भुईमुगाची काढणी करावी.




**खरीप ज्वारी-** खरीप ज्वारीच्या कणसाचा दांडा पिवळा झाल्यावर तसेच कणसाच्या खालच्या भागातील दाणे टणक झाल्यावर आणि दाण्याचा खालचा भाग काळा झाल्यानंतर (१७ ते १८ टक्के ओलावा असताना) कापणी करावी.

**भात-** भाताच्या लोंब्यांमधील ८० ते ९० टक्के दाणे पक्व झाल्यानंतर भाताची कापणी करावी. कापलेला भात वाळण्यासाठी १ ते २ दिवस पसरुन ठेवावा व नंतर मळणी करावी.

**मका-** मक्याच्या कणसावरील आवरण पिवळसर पांढरे झाल्यावर कणसे सोलून खुडून घ्यावीत. कणसे उन्हात २ ते ३ दिवस चांगले वाळवावीत.

**सूर्यफुल व तीळ-** सूर्यफुलाची पाने, देठ व फुलाची मागील बाजू पिवळी झाल्यावर काढणी करावी. साधारणपणे ७५ टक्के पानाचा व खोडाचा रंग पिवळसर दिसायला लागल्यावर तिळाचे पीक काढणीस योग्य झाले आहे असे समजावे. लवकर काढणी केल्यास तीळ बारीक व पोकळ राहतात. तर काढणीस उशीर केल्यास तीळ शेतात गळून पडतात.

**बाजरी** - बाजरीचे कणीस हातात दाबले असता त्यातून दाणे सुटणे, तसेच दाताखाली दाणा चावल्यानंतर कट्ट असा आवाज आल्यास बाजरीचे पीत कापणीस योग्य झाले आहे असे समजावे. ताटाची कणसे विळयाने कापून ती गोळा करुन, वाळवून नंतर मळणी करावी.

**- डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्रज्ञ**




## ९० टक्के लोक चालताना 'ही' चूक करतात म्हणून वजन जसच्या तसंच राहतं; नेमकं कधी चालावं,पाहा

**दि.५ विदर्भ प्रजसत्ताक**

चालणं हा एक उत्तम व्यायाम आहे वजन कमी करण्यासाठी अनेक वर्षांपासून लोक चालण्याचा व्यायाम करत आहेत. जुन्या जमान्यात लोक ना जीमला जायचे ना योगा क्लासेसला पण दिवसभर चालणं आणि मेहनतीचे काम करणं हेच त्यांचं फिटनेस सिक्रेट होतं. आजकाल लोक फिटनेससाठी मॉर्निंग वॉक किंवा इव्हिनिंग वॉक करतात. रोज १० हजार पाऊलं चालणं हा फिटनेसचा ट्रेंड झाला आहे. कोणतंही फॅन्सी डाएट करून तुम्ही वजन कमी करण्यापेक्षा तुम्ही एक चांगलं हेल्दी डाएट घेऊ शकता. मानसिक आरोग्यासाठी हे फायदेशीर ठरते.

जामा न्युरोलॉजी आणि जामा इंटरनल मेडिसिनच्या अभ्यासानुसार रोज कमीत कमी ३० मिनिटं चालल्यानं कॅन्सर आणि वेळेआधी मृत्यू होण्याचा धोका १० टक्के कमी होतो. जर तुम्ही रोज १० हजार पाऊलं चाललात हेल्थ रिस्क जास्त असते वॉकिंगमुळे फक्त शारीरिक स्वास्थ चांगले राहते याशिवाय मानसिक आरोग्यही चांगले राहते आणि तब्येतीवरही सकारात्मक परिणाम होतो.

रिकाम्या पोटी चालण्याचे फायदे

रात्री झोपण्यासाठी सकाळी पहिल्यांदा चालल्यानंतर मेटाबॉलिझ्म चांगला राहतो आणि शरीर पोषक तत्वांना व्यवस्थित शोषून घेते.

एक उत्तम मेटाबॉलिझ्म तुमची एनर्जी चांगली ठेवतो आणि तुम्ही पूर्ण दिवस न थकता काम करू शकता. चालल्यानं ब्लड फ्लो चांगला राहतो आणि एनर्जी वाढते. अभ्यासानुसार पोटाचे व्यायाम




केल्यानं वजन कमी होण्यास मदत होते आणि वेगानं फॅट बर्न होण्यास मदत होते. जर तुम्ही वजन कमी करू शकत असाल तर वॉकिंगमुळे फायदे होतात.नॉटिंगम ट्रेंट युनिव्हर्सिटीच्या अभ्यासानुसार रिकाम्या पोटी व्यायाम केल्यानं ७० टक्के कॅलरीज बर्न होण्यास मदत होते. जे लोक खाण्याच्या दोन तासांनी व्यायाम करतात. त्यांच्याही शरीरात चांगला परिणाम दिसून येतो. सकाळी रिकाम्या पोटी चालल्यानं तुम्हाला व्हिटामीन डी मिळेल. कारण सकाळच्या ऊन्हात गेल्यानं व्हिटामीन डी मिळते. सकाळी ८ वाजताची वेळ व्हिटामीन डी च्या अवशोषणासाठी उत्तम आहे. ज्यामुळे इम्यूनिटी वाढण्यासही मदत होते.

# नागपुरी गेट डेप्युटी ग्राउंडच्या जागेला शासनाची हॉकी मैदानासाठी मंजुरी

## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने पाठवला होता प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती-** अमरावती नागपुरी गेट-वलगाव रोड परिसरातील डेप्युटी ग्राउंडच्या ३ एकर जागेला शासनाच्या महसूल विभागाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाला हस्तांतरित करावे, असे निर्देश शासकीय अध्यापक विद्यालय (पुरुष) यांना दिले आहे.अॅस्ट्रोटर्फ हॉकी मैदान तयार करण्यासाठी जागा मिळावी, असा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे शासनाकडे पाठवण्यात आला होता. अध्यापक विद्यालयाच्या ताब्यात असलेली भूमापन क्र. ८२ बी, प्लॉट क्र. २७ च्या एकूण ७८१५७.२० चौ. मी. पैकी ३ एकर जागा क्रीडांगणासाठी ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने क्रीडा विभागाला हस्तांतरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. आ. सुलभा खोडके यांच्या पाठपुराव्या मुळे शासनाने अॅस्ट्रोटर्फ हॉकी मैदानासाठी भाडेपट्ट्याने देण्यास



मंजुरी दिली आहे. शहराच्या पश्चिम भागात हॉकीचे अॅस्ट्रोटर्फ मैदान व स्टेडियम साकारण्याची मागणी स्थानिक हॉकीप्रेमी व खेळाडूंकडून मागील २५ ते ३० वर्षांपासून केली जात होती. शहरातील डेप्युटी मैदान हे हॉकी स्पर्धेसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी हॉकीचे मैदान व्हावे, यासाठी आमदारांच्या पाहणीनंतर क्रीडा विभागाने १५ जानेवारी २०२० रोजी प्रस्ताव तयार करून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाला पत्र दिले. नागपुरी गेट परिसरातील शिक्षण विभागाच्या ताब्यातील जागा हॉकी स्टेडियम विकसित करण्यासाठी क्रीडा विभागाला हस्तांतरित करण्याचे आदेश काढावे, अशी विनंती केली होती. यासाठी आवश्यक सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर शासनाने जागा क्रीडा विभागाला हस्तांतरित करण्याचे आदेश दिले आहेत.

# शेतकरी संघटनेच्या ठिय्या आंदोलन सुरूचः पीक विम्याच्या अग्रिमची शेतकऱ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी या वर्षी सततच्या पावसामुळे खरीप हंगामासह केळी, संत्री व लिंबूवर्गीय फळ पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून शेतकरी पीक विम्याची अग्रिम रक्कम भरतात. परंतु, विमा कंपनी प्रतिनिधी व कृषी सहायक यांचा आपसी ताळमेळ नसल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानीचा मोबदला मिळत नाही. त्यामुळे शेतर्कयांना तत्काळ पीक विमा लागू करावा, या मागणीसाठी दोन दिवसांपासून शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते तालुका कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलनाला बसले आहेत. शेतकऱ्यांचा संताप व आक्रोश पाहता कृषी अधिकारी व तहसीलदार आंदोलन स्थळी चर्चा करण्यास आले असता, शेतकऱ्यांनी त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला.

दरम्यान दोन्ही अधिकाऱ्यांनी पीक विमा कंपनीच्या अमरावती विभाग मुख्य प्रतिनिधीशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता, त्यांना समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. वृत्त लिहिस्तोवर शेतकरी कृषी कार्यालयात ठिय्या देऊनच होते, तर कृषी अधिकारी वरिष्ठांसोबत चर्चा करत होते. आंदोलनस्थळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माधवराव गावंडे, तालुकाध्यक्ष



संजय हाडोळे, गजानन पाटील दुधाट, सुनील पाटील साबळे, राकाँचे तालुकाध्यक्ष सागर हरबडे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व हजारो शेतकरी उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ५ ऑक्टोबर २०२४ — शहर/ग्रामिण




# नागपुरी गेट पोलिस स्टेशनवर दगडफेक, १०-१२ पोलिस जखमी

## जमाव पांगविण्यासाठी पोलिसांचा लाठीचार्ज, अश्रुधुराचे नळकांडे फोडले

### पोलिस व्हॅन, बाईकची तोडफोड, हजारोंचा जमाव दाखल

### सीपी, डीसीपी, एसीपींसह १२०० वर पोलिसांचा बंदोबस्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

गाझीयाबाद मधील महंत यतिनरसिंहानंद यांनी एका समुदायाच्या धर्मगुरुबाबात केलेल्या वक्तव्यामुळे धार्मिक भावना भडकविल्याचाआरोप करीत एफआयआर दाखल करण्याची मागणी करीत एक शिष्टमंडळ नागपुरी गेट पोलिस स्टेशनमध्ये निवेदन देण्यासाठी पोहोचले. मात्र त्यानंतर अचानक काही आक्रमक लोकांच्या जमावाने पोलिस स्टेशनवर दगडफेक सुरु केली आणि वातावरण तापले. पोलिसांनी रोखण्याचाप्रयत्न केला असता जमाववाढत गेला आणि पुन्हा पोलिस स्टेशनवर दगडफेक सुरु झाली. यात १०-१२ पोलिस जखमी झाले. तर पोलिसांच्या एका गाडीची तोडफोड करण्यात आली. जमाव वाढत असल्याचे पाहून तत्काळ या ठिकाणी पोलिसांचा प्रचंड फौजफाटा जमा झाला आणि जमावाला पांगविण्यासाठी लाठीचार्ज आणि अश्रुधुराचे नळकांडे फोडण्यात आले. रात्री उशिरापर्यंत जमावाला पांगविण्याची कारवाई सुरु होती. तर परीसरात सीपी नवीनचंद्र रेड्डीं, डीसीपी, एसीपींसह १२०० वर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



### लाठीचार्ज, अश्रुधुराचे नळकांडे फोडले

जमाव आक्रमक आणि दगडफेक सुरुच ठेवत असल्याचे पाहून पोलिसांनी जमावाला पांगविण्यासाठी प्रथम लाठीचार्ज केला आणि अश्रुधुराचे नळकांडे फोडले. त्यानंतर पोलिसांनी या भागातील विद्युत पुरवठा खंडित केला. तरी काही लोक पोलिसाची टिम एका बाजुला गेल्यानंतर दुसऱ्या बाजुने दगडफेक करीत असल्याचे चित्र होते. मात्र पोलिसांनी त्यानंतर जमाव पांगविणे सुरु केल्यानंतर उशिरा वातावरण निवळले.

गाझीयाबादमध्ये महंत यति नरसिंहानंद यांनी एका समुदायाच्या धर्मगुरुबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते. धार्मिक भावना भडकविण्यात आल्याचा आरोप करीत त्यांच्या विरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी करीत एका समुदायाचे शिष्टमंडळ शुक्रवारला रात्रीनागपुरी गेट पोलिस स्टेशनवर पोहोचले. मात्र तेथेसमाधान न झाल्याने वातावरण तापले, त्यातील काही आक्रमक लोकबाहेर पडल्यानंतर लगेच जमाव झाला आणि पोलिस स्टेशनवर दगडफेक करायला सुरुवात केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, पण, हैदरपुरा, चाँदणी चौक, सौदागर पुरा चौक या भागाकडून एक-एक जमाव यायला लागला टी आणि पोलिस स्टेशनवर दगडफेक केली. या दगडफेकीत १०-१२ पोलिस जखमी झाले आहेत.

### दगडफेकीत १०-१२ पोलिस जखमी

संतप्त जमावाने केलेल्या दगडफेकीत दीपक केशवराव तिरके (३५) एस आर पी एफ कर्मचारी अशोक हिम्मत कोल्हे (३९), एस आर पीएफ जवान अंबादास महादेवराव मोहोड, वलगाव पोलीस कर्मचारी सचिन कैलास, वाहन चालक सचिन कैलास काळे, वाहन चालक सुमित वीर सिग राठोड या पाच जणांसह आणखी पाच-सहा जण जखमी झाले आहे. या सर्वांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

### १२०० वर पोलिस दाखल

संतप्त जमावाने पोलिसांची एमएच २७ एए १८८ नंबरच्या गाडीवर दगडफेक करून तोडफोड केली. स्थिती आणखी बिघडत जात असल्याचे पाहून तत्काळ अतिरिक्त पोलिस, एसआरपीएफच्या तीन तुकड्या, दंगा नियंत्रक पथक, क्युआरटी, १० पोलिस स्टेशनचे अधिकारी, डीबी स्कॉड, एसपींसह ग्रामीण पोलिस पथक, क्राईम ब्रांचच्या दोनटिम आदींसह १२०० वर पोलिस तत्काळ दाखल झाले.

### ८-१० संशयित ताब्यात

**रात्री वातावरण शांत, जमावबंदी आदेश-** दरम्यान सीपी नवीनचंद्र रेड्डी स्वतः ताफ्यासह दाखल होवून ऑनरोड उतरले आणि त्यांनी पोलिस पथकासह यापरीसरात राऊंड मारला. लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले. तसेच स्थिती नियंत्रणात राहावी म्हणून जमावबंदीचे आदेश जारी करण्यात आले आहे. तसेच धार्मिक स्थळावरून सुद्धा लोकांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले.

# दर्यापुरातील ऐतिहासिक झाडांचा मुद्दा पोहोचला उच्च न्यायालयात

## जलवृक्ष चळवळीच्या वृक्षप्रेमींनी दाखल केली जनहित याचिका



### आम्ही याचिका दाखल केली

आम्ही ३ ऑक्टोबर रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. शुक्रवारी उच्च न्यायालयाने पुढील तारखेपर्यंत व खेपर्यंत वृक्ष कापू नये, असे सांगितले आहे.

**विजय विल्हेकर, संकल्पक, जलवृक्ष चळवळ**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५दर्यापूर-** दर्यापूर शहरातील बसस्टँड ते शिवाजीनगर रस्त्याच्या दुतर्फा असलेली ब्रिटिशकालीन झाडे रस्ता रुंदीकरण व सुशोभीकरणासाठी कापण्याचा निर्णय नगरपालिका प्रशासनाने तीन वर्षांपूर्वी घेतला होता. दरम्यान ऐतिहासिक व पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली ही झाडे कापू नये, यासाठी जलवृक्ष चळवळीतील वृक्षप्रेमींनी कडाडून विरोध केला आहे. यातच नगरपालिका प्रशासनाला या प्रकरणी न्यायालयाने ते वृक्ष तोडण्यासाठी परवानगी दिल्यामुळे शनिवार, ५ ऑक्टोबरला वृक्ष तोडण्यात येणार होते. मात्र या निर्णयाविरोधात वृक्षप्रेमींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित न याचिका दाखल केली आहे. बाच याचिकेबाबत ४ ऑक्टोबरला उच्च न्यायालयाने या प्रकरणात पुढील तारखेपर्यंत झाडे तोडूनये, अशा सूचना केल्या आहेत.

जलवृक्ष चळवळीच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून बसस्टँड-जुनी नगर परिषद ते शिवाजीनगर रस्त्याच्या दुतर्फा असलेली ब्त न. ब्रिटिशकालीन वृक्षांचे जतन करावे, यासाठी वेळोवेळी सत्यताह करण्यात आला. मात्र, नगरपालिका प्रशासनाने १ ऑक्टोबरला वृक्ष ती कापण्यास सुरुवात केली होती. त्यावेळी डे, जलवृक्ष चळवळीचा व वृक्षप्रेमींचा विरोध लक्षात घेता झाडांची कत्तल प्रशासनाकडून थांबवण्यात आली होती. दरम्यान प्रशासनाला न्यायालयाची झाडे कापण्याबाबत परवानगी मिळाल्याचे प्रशासनाने सांगितले होते. मात्र शुक्रवारी सायंकाळी उच्च न्यायालयाचे आदेश आल्यामुळे आता शनिवारी वृक्षतोड होणार नसल्याचे दिसत आहे.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांच्या निधीचे ५ ऑक्टोबरला वितरण-कृषी मंत्री धनंजय मुंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** पी.एम. किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी या योजनांचे माहे ऑगस्ट २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीतील अनुक्रमे १८ वा व पाचवा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवार ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी (ता.मानोरा) येथील निधी वितरण समारंभात करण्यात येणार आहे. या समारंभास राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यवतमाळ -वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

शेतक-यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहेत. पी. एम. किसान योजने अंतर्गत दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ अखेर राज्यातील जवळपास १.२० कोटी शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यावर एकूण १७ हप्त्यांमध्ये सुमारे रू. ३२००० कोटीचा लाभ जमा झालेला आहे.



पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सन २०२३-२४ पासून नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या १४ व्या हप्त्यापासून पुढील प्रत्येक हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण चार हप्त्यांमध्ये एकूण ९१.४५ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रु. ६९४९.६८ कोटी लाभ अदा करण्यात आला आहे. जून २०२३ पासून आयोजित गावपातळीवरील विशेष मोहिमांद्वारे पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या बाबींची २० लाखाहून अधिक शेतकऱ्यांची पूर्तता झाल्याने देशपातळीवर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांची संख्या आज रोजी योजनेच्या लाभासाठी पात्र ठरली आहे.

केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या १८ व्या हप्त्याच्या लाभ वितरणावेळी राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ईकेवायसी पूर्ण केलेल्या एकूण ९१.५२ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात रू. १९०० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ तर राज्याच्या योजनेमधून रू. २००० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे.या समारंभामध्ये पी. एम. किसान योजने अंतर्गत रू. २०००/ तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत रू. २०००/ असा एकूण ४००० रुपये चा लाभ प्रधानमंत्री महोदयांच्या हस्ते राज्यातील सुमारे ९१.५२ लाख पात्र शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होईल. पी. एम. किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधीच्या लाभ वितरण समारंभात https://pmindiawebcast.nic.in या लिंकआधारे राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी केले आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीत ५२ हजार स्क्वेअर फूट शेड उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** -कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य धान्य यार्डवर शेतकरी मेळावा व विकास कामांचा लोकार्पण सोहळा घेण्यात आला. यावेळी खा. बळवंत वानखडे यांचा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी येथील शारदामाता टिन शेडचे काँक्रिटीकरण, ६०० मे. टन गोदाम समोरील शेडचे बांधकाम तसेच गाळण यंत्रासमोरील शेडचे बांधकाम करण्यात आले. यामुळे आता शेतकऱ्यांचा शेतमालाचा लिलाव करण्याकरिता अतिरिक्त ५२ हजार स्क्वेअर फूट शेड उपलब्ध झाले आहेत.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. ॲड. यशोमती ठाकूर, खा. बळवंत वानखडे, भास्कर पेरे, पंजाबराव डख,



माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शिवसेनेच्या प्रीती बंड,माजी महापौर विलास इंगोले, हरिभाऊ मोहोड यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.या वेळी माजी सरपंच आदर्श गाव, पाटोदा जि. छत्रपती संभाजीनगर येथील भास्कर पेरे यांनी ग्रामीण भागातील संस्कृती व विकास साधण्याची क्षमता आदींबाबत माहिती दिली. तसेच हवामान विश्लेषक पंजाबराव डख यांनी बदलते हवामान व यामुळे उत्पन्न होणाऱ्या शेतीशी निगडीत समस्यांची माहिती दिली. तत्पूर्वी, ५० हजार लिटर क्षमता पाण्याचे टाकीचे बांधकाम, शेतमाल वजन मापाकरिता १०० मे. टन क्षमतेचा भुईकाटा, बडनेरा गुरांचा बाजार येथे जनावरांना चढ उतार करण्याकरिता रॅम्पचे बांधकाम, प्रकाश व्यवस्थेकरिता १२५ केव्ही क्षमतेचे जनरेटर आदी विविध विकास कामांचे मान्यवरांचे हस्ते लोकार्पण करण्यात आले.

# मूग, उडीद, सोयाबीनचे हमीभाव जाहीर


## नाफेडमार्फत खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू, खरेदीचे वेळापत्रकही निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये शासनाने आधारभूत खरेदीसाठी हमीभाव निश्चित केले आहेत. या योजनेंतर्गत नाफेडमार्फत मूग, उडीद, सोयाबीनच्या खरेदीकरिता नोंदणी सुरू करण्यात आली आहे. तसेच खरेदीचे वेळापत्रकदेखील निश्चित करण्यात आले आहे. १० ते १५ ऑक्टोबर पासून तिन्ही उत्पादना च्या खरेदीला सुरुवात होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या वतीने जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ च्या उत्पादनाकरिता निश्चित केलेल्या आधारभूत खरेदी योजनेंतर्गत नाफेडमार्फत मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी प्रक्रियेला १ ऑक्टोबर पासून सुरुवात करण्यात आलेली आहे. त्यासाठी शेतकऱ्यां नी आपल्या तालुक्यातील नजीक च्या नाफेड खरेदी केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रा सह नोंदणी करावी व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी हमीभाव योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. नोंदणीसाठी आधारकार्ड, आधार लिंक असलेले बँक पासबुक तसेच चालू वर्षाचा पीकपेरा असलेला सातबारा आदी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. मूग पिकाचा खरेदी कालावधी १० ऑक्टोबर ते ७ जानेवारी २०२५ असा राहील. उडीदचा खरेदी कालावधी १५ ऑक्टोबर ते १२ जानेवारी तर सोयाबीन खरेदीचा कालावधी १५ ऑक्टोबर ते १२ जानेवारी २०२५ असा राहणार आहे.

**असे राहणार हमीभाव (दर प्रतिक्विंटल)**

| | |
|---|---|
| मूग | ८,६८२ रुपये |
| उडीद | ७,४०० रुपये |
| सोयाबीन | ४,८९२ रुपये- |






# काँग्रेसनेच केला बाबासाहेब आंबेडकरांचा सर्वाधिक अपमान

## संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नागपूर –** लोकसभा निवडणूकीच्या कालावधीत काँग्रेसने भाजप संविधानविरोधी असल्याचा खोटा अपप्रचार केला. प्रत्यक्षात स्वातंत्र्यानंतर काँग्रेसनेच वारंवार संविधानाची हत्या केली. इतकेच नव्हे तर देशाला संविधान देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेसलाच कंटाळून मंत्रीपदाचा राजिनामा दिला होता. काँग्रेसने वारंवार बाबासाहेबांचा अपमान केला होता, असा आरोप संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी लावला. नागपुरात शुक्रवारी ते पत्रपरिषदेदरम्यान बोलत होते.

लोकसभा निवडणूकीत काँग्रेसने अपप्रचाराचे जाळे विणले व त्यात अनुसूचित जाती तसेच जमातीचे नागरिक अडकले. प्रत्यक्षात भाजपनेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतींना जपण्याचे मौलिक कार्य केले. काँग्रेसने त्यांना भारतरत्नदेखील मिळू दिले नव्हते. काँग्रेसचे सरकार गेल्यावरच त्यांना हा सन्मान मिळाला होता. ज्यांनी बाबासाहेबांच्या संविधानाला कधी मानले नाही तेच लोक आता संविधान हाती घेऊन राजकारण करीत आहेत, अशी टीका रिजिजू यांनी केली..

काँग्रेसच्या भूलथापांना आमचा समाज बळी पडला. काँग्रेस पक्ष हाच संविधानाचा मारेकरी आहे. त्यांना मतदान केल्यास जनता आपल्याला कधीच माफ करणार नाही. काँग्रेसकडून संविधानाचे नाव घेऊन अपप्रचार सुरूच राहिला तर रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा रिजिजू यांनी दिला.

### राहुल गांधी विरोधी पक्षनेते झाले हा शापच

यावेळी रिजिजू यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली. राहुल गांधी यांच्या कुटुंबाने कधीच संविधानाचा आदर केला नाही. त्यांना संविधानाची तत्वेदेखील समजत नाहीत. ते



देशाच्या लोकसभेचे विरोधी पक्षनेते झाले हा शापच म्हणावा लागेल, असे प्रतिपादन रिजिजू यांनी केले.

### प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन

केंद्र शासनाकडून राज्य शासनाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन उभारण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. हे भवन सर्व जातीधर्मांसाठी खुले असेल. यात विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, वाचनालय, क्रीडा सुविधा उपलब्ध असतील. यासंदर्भातील प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीदेखील चर्चा झाली आहे, अशी माहिती रिजिजू यांनी दिली.

### दीक्षाभूमीला दिली भेट

दरम्यान, रिजिजू यांनी दीक्षाभूमीला भेट देऊन बाबासाहेबांच्या पवित्र अस्थींचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासमवेत प्रदेश उपाध्यक्ष ड.धर्मपाल मेश्राम, माजी आमदार मिलींद माने, प्रदेश प्रवक्ते चंदन गोस्वामी, सुभाष पारधी, संदीप गवई प्रामुख्याने उपस्थित होते.

# पंतप्रधानांच्या डोळ्यात धूळफेक, अपूर्ण योजनेचे उद्घाटन

## चौकशीची मागणी : यवतमाळकरांना सध्याही मिळते सहा दिवसाआड पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५यवतमाळ :** शहराला २४ तास पाणी देण्याचे उद्दिष्ट ठेवून २०१७ मध्ये ३०२ कोटी रुपयांची अमृत पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आली. सध्या शहराला सहा ते आठ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. काही भागांना तर ऐन पावसाळ्यात टंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहेत. तरीही योजना पूर्ण झाल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना चुकीची माहिती देऊन त्यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन उरकण्यात आले. चुकीची माहिती देणाऱ्या या अधिकाऱ्यांची पंतप्रधान कार्यालयाकडून चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी आता पुढे आली आहे.अमृत पाणीपुरवठा योजनेद्वारे यवतमाळ शहराला २४ तास पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. २०१७ मध्ये ही योजना हाती घेतली. पुढील ३० महिन्यात योजना पूर्ण करायची होती. प्रत्यक्षात प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे ऑक्टोबर २०२४ मध्येही शहरातील विविध भागांना तब्बल सहा ते आठ दिवसानंतर पाणी मिळत आहे. बेंबळा धरण ते टाकळी फिल्टर प्लांट ही १८ किलोमीटर लांबीची मुख्य पाइपलाइन अनेक ठिकाणी



फुटल्याने ती बदलण्याची नामुष्की ओढवली. त्यातच शहराअंतर्गतची पाइपलाइनही निकृष्ट निघाल्याने आजही जागोजागी पाण्याची गळती होत आहे.

दुसरीकडे योजनेसाठीची यंत्रसामग्रीही अल्पावधीतच कुचकामी ठरत आहे. अशा दुष्टचक्रात ही योजना अडकली असताना २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीदिनी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या उपस्थितीत ऑनलाइन पद्धतीने या योजनेचे अचानकपणे उद्घाटन झाले. उद्दिष्टाप्रमाणे योजना पूर्ण झालेली नसताना पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन करून नेमके काय साधले, असा प्रश्न आता यवतमाळकरातून केला जात आहे. पिण्याचे पाणी, अन्नधान्य, औषधी अशा काही बाबी या राजकारणाच्या पलीकडे असतात. मात्र, यवतमाळ शहराला थेंबभर पाणी मिळत नसताना काही जणांकडून याचंही राजकारण केले जात असल्याची शहरात चर्चा आहे. सरकारच्या योजना योग्य पद्धतीने राबवायच्याच नाही, असा चंगच जणू यवतमाळमध्ये बांधल्याचे दिसत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेचीही तब्बल साडेचार हजार घरकुले जिल्ह्यात रखडलेली आहेत. दरम्यान अमृत पाणी पुरवठा योजनेच्या उद्घाटना बाबत पंतप्रधानांची दिशाभूल केल्या प्रकरणी जबाबदार अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींवर फौजदारी करण्याची मागणी काँग्रेसचे कोषाध्यक्ष ओम तिवारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

### ३०२ कोटी रुपये खर्चून काय साधले?

या योजनेच्या पूर्वी यवतमाळ शहराला निळोणा आणि चापडोह येथून तीन ते चार दिवसाआड पाणीपुरवठा होत होता. आता योजनेचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केल्यानंतरही शहराला सहा ते आठ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. पूर्वी पाणीपुरवठा योजनेसाठी दरमहा ८० लाखांचे वीजबिल यायचे. ते आता सव्वा कोटींवर येत आहे. विशेष म्हणजे सध्या दररोज ६० दशलक्ष घनमीटर पाण्याचा उपसा योजनेद्वारे केला जात असताना प्रत्यक्षात ३५ दशलक्ष घनमीटर पाणीच यवतमाळकरांच्या घरात पोहोचत आहे, तेही सहा ते आठ दिवसाआड. त्यामुळे ३०२ कोटी रुपये खर्चून प्रशासनाने नेमके काय साध्य केले, असा प्रश्न आहे.

# पारधी समाजाच्या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती,**एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालय धारणीतर्फे पारधी समाजाच्या विकारासाठी योजना सन २०२३-२४ अंतर्गत मंजूर योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या फक्त पारधी समाजाच्या लाभार्थ्यांकडून योजनांचे अर्ज २३ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मागविण्यात आले आहे.योजनाचे अर्ज धारणी, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी या ठिकाणी नांदगाव खंडेश्वर, भातकुली, अमरावती, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, व दर्यापूर तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती, तसेच मोर्शी, वरुड, चांदूरबाजार तिवसा तालुक्यातील लाभार्थ्यांकरीता प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी अंतर्गत उप कार्यालय, मोर्शी येथे अर्ज उपलब्ध आहे. याबाबत अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७२२६-२२४२१७ तसेच कार्यालयातील विकास शाखेशी संपर्क साधावा.यात पारधी समाजाच्या लाभार्थ्यांच्या शेतात बोअरवेल करणे या योजनेसाठी शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अर्जाच्या ज्येष्ठतेनुसार संगणीकृत यादी तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर कागदपत्रे तपासणी होऊन पात्र, अपात्र अर्जदाराच्या याद्या तयार करण्यात येणार आहे.

# ‘जैश’कडून रक्तपाताची धमकी, रेल्वेच्या सुरक्षा यंत्रणां हाय-अलर्ट: खबरदारीच्या विविध उपाययोजना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नागपूर–** आंतर ष्ट्रीय दहशतवादी संघटना 'जैश ए मोहम्मद'ने रेल्वे स्थानकांवर बॉम्बस्फोट करण्याची धमकी दिल्याने सर्वत्र प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, नागपूर, महाराष्ट्रातील रेल्वे स्थानकांसह अन्य राज्यातील रेल्वे स्थानकांनाही सुरक्षेचा वेढा घालण्यात आला आहे. रेल्वेशी संबंधित सर्वच सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या असून बॉम्ब शोधक आणि नाशक पथकासह रेल्वे स्थानकाच्या कानाकोपऱ्यावर नजर रोखण्यात आली आहे.

विविध राज्यातील ८ मोठ्या रेल्वे स्थानकांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेने दिली आहे. सुरक्षा यंत्रणांना तसे ईनपूट मिळताच गंभीर दखल घेण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, देशभरातील रेल्वे प्रशासन आणि रेल्वे सुरक्षा यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या आहेत. विविध प्रांतातील रेल्वे सुरक्षा यंत्रणांमधील शिर्षस्थांनी आपसात समन्वय करीत आपापल्या कार्यक्षेत्रातील रेल्वे




पोलीस, रेल्वे सुरक्षा दल आणि रेल्वे कर्मचाऱ्यांना अतिसतर्कतेचे आदेश दिले आहे.

विशेष म्हणजे, सध्या सुरू असलेल्या नवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त ठिकठिकाणच्या शक्ती पीठांमध्ये, माता मंदीरात दर्शन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविक जात-येत आहेत. त्यामुळे रेल्वेगाड्यांमध्ये तसेच रेल्वे स्थानकांवर प्रचंड गर्दी आहे. त्यात विचाराचे सोने लुटण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येत बाबासाहेबांचे अनुयायी दसऱ्याला नागपूरच्या दीक्षाभूमीवर येतात. त्यामुळे येथील रेल्वे स्थानकांवर प्रचंड गर्दी असते. ही पार्श्वभूमी आणि जैशकडून मिळालेली धमकी बघता सुरक्षा यंत्रणा हायअलर्ट झाल्या आहेत. गर्दीचा लाभ ऊठवत कुण्या समाजकंटकाने संधी साधू नये म्हणून नागपूर रेल्वे स्थानकावरही सुरक्षेच्या खास उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**धमकीच्या वृत्ताला दुजोरा**

सूत्रांच्या माहितीनुसार, जैश-ए-मोहम्मदचा येरिया कमांडर मोहम्मद सलीम अंसारी याने ही धमकी दिली आहे. या संबंधाने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे संपर्क केला असता घातपाताच्या इनपूटबाबतची माहिती त्यांच्याकडून मिळाली नाही. मात्र, धमकी मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले असून सुरक्षेच्या उपाययोजनांचीही माहिती दिली आहे.

### बीडीडीएस सज्ज, स्कॅनरवरही खास नजर : रेल्वे पोलीस अधीक्षक

रेल्वे स्थानकावर अतिरिक्त बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून रेल्वे स्थानकाच्या संपूर्ण परिसरावर सूक्ष्म नजर रोखण्यात आली आहे. आरपीएफच्या मदतीने पेट्रोलिंग वाढविण्यात आली आहे. बॅग स्कॅनरवर खास लक्ष ठेवले जात असून, संशयास्पद वाटणाऱ्या प्रत्येकाची तपासणी केली जात आहे. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाकडून, श्वानांकडून कुठे काही संशयास्पद आहे का, त्याची आम्ही खातरजमा करून घेत आहोत, अशी माहिती रेल्वेचे पोलीस अधीक्षक अक्षय शिंदे यांनी दिली.

### सर्व सुरक्षा यंत्रणांचा समन्वय : सुरक्षा आयुक्त

कुण्या एका रेल्वे स्थानकाला धमकी मिळाली हे सांगणे योग्य होणार नाही. मात्र, धमकीच्या पार्श्वभूमीवर आम्ही सर्व सुरक्षा यंत्रणां समन्वयाने काम करीत आहोत. आरपीएफ, जीआरपी आणि रेल्वे प्रशासनाला अतिसतर्कतेचे आदेश देण्यात आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी २४ तास सजगपणे काम केले जात असल्याची माहिती आरपीएफचे वरिष्ठ सुरक्षा आयुक्त दीपचंद्र आर्य यानी लोकमतशी बोलताना सांगितले.


# छत्री तलावची सुनावणी पुढे ढकलली

## राज्य शासनाच्या वकिलानेही दिले वैयक्तिक कारण

## पोहरा जंगल बचाव समितीची नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती :** छत्री तलावाच्या काठावर पाणथळ व दलदलीची जागा (वेटलैण्ड) असतानाही महापालिकेने तलावाच्या सौंदर्याकरणासाठी बांधकाम केले. या बांधकामावर पोहरा जंगल बचाव समितीने आक्षेप घेतल्याने राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी)कडे सुनावणी सुरू होती; मात्र महापालिकेच्या वकिलांनी चिकनगुनिया झाल्याचे कारण देत सुनवाणी पुढे ढकलण्याची मागणी केली होती. त्यामुळे आता ही सुनावणी थेट १२ फेब्रुवारी २०२५ मध्ये होणार आहे. गत काही महिन्यांपासून हे



प्रकरण एनजीटीच्या कोर्टात सुरू आहे. या प्रकरणी आता पुढील सुनावणी होणेअपेक्षित असतानाच महापालिकेच्या वकिलांनी चिकनगुनियाचे कारण देत सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी केली. एवढेच व्हे, तर राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या वकिलांनीही वैयक्तिक कारण देत हो सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी केली आहे. त्यामुळे एनजीटीने त्यांची मागणी मान्य करून सुनावणी पुढेढकलली आहे. दरम्यान, एनजीटीने महापालिका व राज्य शासनाची विनंती मान्य केली असली, तरी याचिकाकर्त्यांकडून मात्र याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. तसेच प्रशासन मुद्दाम वेळकाढूपणा करीत असल्याचाही आरोप होत आहे.

# नवरात्र, उत्सवात शहरातील वाहतूक मार्गात बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती:** शहरात श्री अंबादेवी संस्थान येथे नवरात्र व अंबादेवी यात्रा उत्सव साजरा होत आहे. या उत्सवाच्या कालावधीत दि. १२ ऑक्टोबरपर्यंत मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत.बंद करण्यात आलेले मार्गवाहतूकीसाठी दि. १२ ऑक्टोबरपर्यंत पुढील मार्ग बंद करण्यात आले आहे. यात राजकमल चौक ते अंबागेट, साबणपुरा खिडकी ते गांधी चौक, ओसवाल भवन ते गांधी चौक, डॉ. धवड यांचा दवाखाना ते गांधी चौक, मुख्य पोस्ट ऑफिस रोड ते पंचशील लॉंड्री आणि गांधी चौक, भुतेश्वर चौक ते गांधी चौक, नमुना गल्लीकडून अंबादेवी देवस्थानाकडे जाणारे सर्व लहान रस्ते या कालावधीत बंद राहतील. तसेच सक्करसाथ ते भाजीबाजार जैन मंदिरापर्यंत, टांगापडाव ते साबनपुरा पोलीस चौकी ते प्रभात चौक हा रस्ता अरुंद असल्याने जड वाहनास बंद राहील. अंबागेट ते औरंगपुरामार्गे अंबादेवी मंदिराकडे जाणारा मार्ग सर्व वाहनांसाठी बंद राहील.वाहतूकीस पर्यायी मार्गमालवाहू जड व हलकी, गिट्टी, बोल्डर, वाहने जुनी वस्ती बडनेरा टी पॉईंट येथून जुना बायपासमार्गे एमआयडीसी, दस्तूरनगर चौक, चपराशीपुरा चौक, बियाणी चौक येथून डावे वळण घेऊन गर्ल्स हायस्कूल चौक, इर्विन चौक, मालवीय चौक, दीपक चौक मार्गाचा अवलंब करता येईल. बस स्टँड, राजकमल, गद्रे चौकमार्गे बडनेराकडे जाणाऱ्या व येणाऱ्या एसटी बसेस वाहनांनी राजापेठ-इर्विन चौक या उड्डाणपुला वरून गर्ल्स हायस्कुल चौक, पोलीस पेट्रोल पंप, एस टी. डेपो किंवा जुनी वस्ती बडनेरा येथून उजवे वळण घेऊन जुना बायपास मार्गाने दस्तूर नगर, चपराशीपूरा चौक, बस स्टॅन्ड या पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. एसटी स्टॅन्ड येथून नागपुरी गेट मार्गे जाणारी एसटी बस रेल्वे स्टेशन चौक, इर्विन चौक ते चित्रा चौक मार्गे जातील. याच मार्गाने शहरात येऊन गर्ल्स हायस्कुल चौक मार्गे एसटी स्टॅन्ड येथे जातील. राजापेठ चौकाकडून शहरात येणारी हलकी चारचाकी वाहनधारकांनी राजापेठ उड्डाण पुलाचा वापर करावा.वाहनतळ पार्कींग व्यवस्थागांधी चौक येथील पार्कींग स्थळ नवरात्र कालावधीत बंद राहील. तसेच दोन्ही मंदिरालगत दोनशे मीटर अंतरापर्यंत कोठेही वाहन ठेवता येणार नाही. वाहनतळ पार्कींगची व्यवस्था नेहरु मैदान, ओसवाल भवन मैदान, मुधोळकर पेठ मैदान, ओसवाल भवन ते गद्रे चौकाकडील रस्त्याच्या एका बाजूस तसेच हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या वळणापासून साई नगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या एका बाजूस आणि साबनपुरा चौक ते जवाहरगेटकडील रस्त्याच्या एका बाजूस करण्यात आली आहे.वाहन चालकांनी या अधिसूचनेचे पालन करणे आवश्यक आहे.

# पर्यावरणाची काळजी घेणे आपले प्रथम कर्तव्य – प्रविण पोटे पाटील

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२४ चे बक्षीस वितरण संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती –** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती च्या वतीने यावर्षी मोठ्या उत्साहात गणेशोत्सव सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धे मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ तसेच घरगुती गणेशोत्सव यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला.सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये पन्नास पेक्षा जास्त मंडळांनी सहभाग तर घरगुती गणेशोत्सव सजावट मध्ये तीनशे पेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदविला होता.

यावर्षी सुद्धा आयोजकांच्या वतीने विविध विषय देखाव्याकरिता पुरविल्या गेले होते यात पर्यावरण पूरक देखावा, सामाजिक संदेश देणारा देखावा , हिंदू सण उत्सव माहिती प्रदान करणारा देखावा, प्राचीन संस्कृती, कला , इतिहासाची माहिती देणारा देखावा , जनजागृती करणारा देखावा यांचा समावेश होता.

स्पर्धे करिता आलेल्या सर्व देखाव्यांचे तज्ञ् परीक्षकांडून बारीक निरीक्षण केल्या नंतर

या सर्व नियम व अटी पार करत सार्वजनिक गणेशोत्सव मध्ये बजरंग गणेशोत्सव मंडळ पटवीपूर अमरावती ला प्रथम पारितोषिक व सन्मान चिन्ह देण्यात आले. रुख्मिणी गणेशोत्सव मंडळ रुख्मिणी नगर अमरावती यांना द्वितीय पारितोषिक व सन्मान चिन्ह तसेच तिसऱ्या क्रमांकासाठी रतनगंज गणेशोत्सव मंडळ



रतनगंज अमरावती यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे घरगुती गणेश उत्सव सजावट स्पर्धा मध्ये एकूण एकवीस विविध रोख बक्षीस व पारितोषिक वितरण करण्यात आले.

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा जगाचा विनाश व्हायला वेळ लागणार नाही पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे गरजेचे आहे.पर्यावरणाची काळजी घेणे आपले प्रथम कर्तव्य आहे. यंदाची गणेशोत्सव सजावट स्पर्धेतील थीम पर्यावरण शी निगडित असल्याने पर्यावरणाचे संतुलन, रक्षण या उद्देशाने सार्वजनिक तरुण मंडळाने आपल्या गणेशोत्सवाचा परिसरात वड , निंब, पिंपळ असे झाडे लावावे असे आवाहन यावेळी मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले तसेच जे सार्वजनिक गणेश मंडळ जास्तीत जास्त पिंपळ, वड यांची झाडे लावले तसेच त्याची काळजी घेईल संगोपन करेल अश्या मंडळांना पुढच्या वर्षी प्रोत्साहन पर विशेष पुरस्कार देण्यात असल्याचे प्रविण पोटे पाटील यांनी प्रतिपादन केले.यावेळी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप संस्थेचे सचिव श्रेयशदादा पोटे पाटील , श्री प्रकाशजी पुंड , चेतनजी पवार तसेच पी. आर. पोटे पाटील गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२४ चे आयोजक प्रा. विशाल इंगोले, प्रा. संदीप जाधव, प्रा. श्रीधर मेंढे, प्रा. विपीन जयस्वाल, प्रा. आकाश कदम तसेच सार्वजनिक व घरगुती गणेश मंडळ सदस्य उपस्थित होते.

# बेलोरा विमानतळावरून प्रवासी विमानाचे उड्डाणच जर होणार नसेल तर अत्यंत घाईघाईत लोकार्पण करणे म्हणजे अमरावतीकरांची सपशेल फसवणूक - डॉ.सुनील देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

जिल्ह्यातील पायाभूत सुविधा, औद्योगिक विकासामध्ये आणि एकूणच दळणवळणामध्ये आमुलाग्र बदल घडवू शकणाऱ्या महत्वाकांक्षी व बहुप्रतीक्षित अशा बेलोरा विमानतळाच्या लोकार्पणाचा कार्यक्रम ९ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी (व्हर्चुअल) पद्धतीने होणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. परंतु, हे लोकार्पण हे अर्धवट विमानतळाचेच आहे. जर विमानतळावरून प्रवासी विमानाचे उड्डाणच जर होणार नसेल तर अत्यंत घाईघाईत सर्वचबाबतीत अपूर्ण अशा बेलोरा विमानतळाचे लोकार्पण करणे म्हणजे अमरावतीकरांची सपशेल फसवणूक करणे होय, अशी टीका माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केली आहे.

विमानतळाच्या केवळ टर्मिनल बिल्डिगचे काम अद्याप पर्यंत पूर्ण झालेले आहे. विमानाचे लैंडिग आणि टेक ऑफ याचे संपूर्ण नियंत्रण एअर ट्रॅफिक कंट्रोल (एटीसी) द्वारे केल्या जाते. याचे कार्यान्वयन अद्यापही अपूर्ण आहे. त्यावर लागणारी उपकरणे आणि तांत्रिक बाबी या पूर्ण झालेल्या नाहीत. एटीसी कार्यान्वित न करता विमानांचे उड्डाण शक्य नाही, असे डॉ. देशमुख यांनी म्हटले आहे.बेलोरा विमानतळाला




अद्यापही नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने मान्यता दिली नसल्याची खात्रीलायक माहिती आहे. त्याचप्रमाणे केंद्राच्याउडान योजने अंतर्गत प्रवासी विमानाची सेवा पुरवणाऱ्या ज्या कंपनीला या मार्गावर परवाना मिळाला आहे त्यांचे कडून अद्यापही प्रस्तावित प्रवासी सेवेचा मार्ग, त्यांचे वेळापत्रक या बद्दल कोणतीही निश्चिती अद्याप झालेली आहे. विमानतळ परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात हरीण, रोही या सारख्या वन्यप्राण्यांच्या मोठा वावर आहे. हे प्राणी वनविभागाद्वारे दुसरीकडे स्थलांतरीत करण्यात येणार आहेत, ते काम अद्याप बाकी आहे. त्याशिवाय विमानांचे सुरक्षित टेक ऑफ आणि लैंडिग अजिबात शक्य होणार नाही.

विमानतळावरून प्रवासी विमानाचे उड्डाणच जर होणार नसेल तर अत्यंत घाईघाईत लोकार्पण करणे म्हणजे अमरावतीकरांची सपशेल फसवणूक करणे होय. विधानसभानिवडणुकांच्या तोंडावर केवळराजकीय लोकार्पण करणे एवढाच याच्या मागे उद्देश आहे. या वस्तुस्थितीपासून प्रत्येक अमरावतीकर अवगत असला पाहिजे, असे डॉ. सुनील देशमुख यांनी म्हटले आहे. निधीअभावी जेव्हा विमानतळाचे काम सातत्याने रखडतच होते, तेव्हा आपण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करून शासनाला निधी देण्यासाठी बाध्य केले होते, याची आठवण डॉ. देशमुख यांनी करून दिली आहे.

## सर्वसामान्य नागरिकांना उपजिल्हा रुग्णालयातून मिळणार संपूर्ण आरोग्य सुविधा- आ. देवेंद्र भुयार यांच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५वरुड**

शहरासह तालुक्यातील आरोग्य यंत्रणेत अमुलाग्रह बदल करण्याच्या हेतुने आ. देवेंद्र भुयार यांनी केलेल्या प्रयत्नाला प्रत्यक्षात यश मिळाल्याची अनुभुती चाक माळयांची उपजिल्हा रुग्णालयाची इमारत पूर्णत्वास जात असल्याचे पाहून तालुक्यातील नागरीक मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त करीत आ. देवेंद्र भुयार यांचे अभिनंदन करीत असल्याचे चित्र सध्या शहरासह संपूर्ण तालुक्यात पहावयास मिळत आहे. वरूड शहर व तालुक्यातील रुग्णांना अमरावती- नागपूर येथे मिळणाऱ्या आरोग्य सुविधा येथेच मिळून त्यांचा पैसा व वेळ वाचेल याकरीता आ. भुयार



यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून वरुड शहरात उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाकडून मंजूर करून घेतला. या उपजिल्हारुग्णालयाकरीता शहरातील प्रसिद्ध डॉ. सुधाकर व डॉ. मिना बंदे दाम्पत्यांनी कोट्यावधी रुपयांची जमिन स-द्धा दान केली. आता शहरात चार माळ्याची उपजिल्हा रुग्णालयाची भव्य ईमारत पुर्णत्वास जात आहे. २०० खाटांचे हे उपजिल्हा रुग्णालय राहणार असुन येथेच रक्तपेढी सुद्धा उपलब्ध राहील. येथे सर्व प्रकारच्या चाचण्या करण्यात येऊन रुग्णांवर शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येणार असल्याने नागरीकांचा पैसा, वेळ ईतकेच नव्हेतर वेळेअभावी होत असलेली प्राणहानी सुद्धा टळणार आहे.

## इलेक्ट्रिक दुचाकीला अचानक आग, परिसरात एकच तारांबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

पोलीस वाहतूक शाखेच्या कार्यालयाजवळ टोईंग वाहनातून नेणाऱ्या इलेक्ट्रिक मोपेड दुचाकीला अचानक आग लागली. या आगीत दुचाकी पूर्ण खाक झाली. ही घटना टोईंग वाहन चालकाच्या लक्षात आल्याने पुढील अनर्थ टळला.

शुक्रवारी संध्याकाळी सातच्या दरम्यान शेगावनाका चौकातील ग्राहकाच्या घरून राजापेठ येथील शोरूमला




घेऊन जाणाऱ्या वाहनातील इलेक्ट्रिक मोपेड दुचाकीला अचानक आग लागल्याने एकच तारांबळ उडाली. आग लागल्याचे टोईंग वाहन चालकाच्या लक्षात येताच त्याने वाहन थांबविले. याबाबत लगेच अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. त्यानंतर तात्काळ दाखल झालेल्या अग्निशमन दलाने वाहन विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत मोपेड दुचाकी पूर्णपणे जळाली होती. सुदैवाने आग लागल्याचे टोईंग वाहन चालकाच्या लक्षात येताच त्याने वाहन थांबविले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

## वन विभागात प्रादेशिकमध्ये ७० रेंज अधिकाऱ्यांविनाच; वने, वन्यजीव वाऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्य निवडणूक आयोगाच्या दणक्यानंतर वन विभागाने १७९ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदल्या काही दिवसांपूर्वी केल्या आहेत. मात्र, अद्यापही प्रादेशिक उपविभागात ७० रेंज रिक्त असून, वन परिक्षेत्राधिकारी कार्यरत नाही, तर दुसरीकडे वन विभाग हा संवेदनशील म्हणून गणला जात असताना मंत्रालयात आरएफओंच्या विनंती बदल्या का करत नाही? असा सवाल उपस्थित होत आहे.



निवडणूक आयोगाने विधानसभेची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सर्वच विभागांत पात्र अधिकारी-कर्मचाऱ्याच्या बदल्या करण्याचे निर्देश दिले आहे. परंतु, गत दीड महिन्यापासून विनंती बदलीसाठी आवश्यक कागदपत्रानिशी आरएफओंनी मंत्रालयात प्रस्ताव दिले असताना त्यावर सचिव अथवा अन्य अधिकारी लक्ष देत नसल्याची ओरड आहे. राज्यात ७० रेंजसाठी सुमारे ४०० पेक्षा जास्त आरएफओंचे अर्ज मंत्रालयात प्रलंबित आहेत, तर प्रादेशिक टू प्रादेशिक बदलीसाठी ३५ अर्ज सादर असल्याची माहिती आहे. मंत्रालयात आरएफओंच्या बदलींची फाइल सांभाळणारे 'जाकरेकर' यांचा तोरा अधिकच आहे. प्रशासकीय बदल्यांमध्ये अन्याय झाला किमान विनंती बदल्यांमध्ये न्याय मिळेल, या आशेने अनेक आरएफओ मंत्रालयाच्या पायऱ्या झिजवून थकले आहे. विनंती बदलीसाठी कौटुंबिक अथवा आरोग्य विषयक ठोस कारण दिले असताना सुद्धा मंत्रालयातील बाबुगिरीच्या अफलातून कारभारामुळे पात्र आरएफओंच्या बदल्या होत नसल्याचे वास्तव आहे.

**'अर्थ'पूर्ण व्यवहार झाले, पण बदली होईना**

वन विभागात प्रादेशिकच्या मलईदार रेंज मिळावी, यासाठी काही आरएफओंनी लोकप्रतिनिधी, राजकीय पुढाऱ्यांच्या माध्यमातून'अर्थ'पूर्ण केले. मात्र, विनंती बदलीचा पत्ता नाही, अशीच स्थिती आहे. येत्या आठवड्यात राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे झालेल्या 'अर्थ'पूर्ण व्यवहाराचे काय होईल, या विवंचनेत आरएफओ आले आहेत.


## निवडणुकीचे सूर उमटले वाद्यांच्या बाजारात उलाढाल वाढली, राज्यातील उमेदवारांची खरेदीसाठी धाव

### इच्छुक उमेदवार एका मंडळासाठी किमान २५ हजार रुपयांचे साहित्य देत असल्याचे चित्र दिसत आहे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ सांगली**

आगामी विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील विविध पक्षांचे उमेदवार मतदारसंघातील भजनी मंडळांना देण्यासाठी मिरजेतून वाद्ये खरेदी करीत आहेत. यामुळे गणेशोत्सवानंतर विधानसभा निवडणुकीमुळे मिरजेतील वाद्याच्या बाजारात उलाढाल सुरू आहे. इच्छुक उमेदवार एका मंडळासाठी किमान २५ हजार रुपयांचे साहित्य देत असल्याचे चित्र दिसत आहे.

धार्मिक कार्यक्रम, सण, उत्सव व गावोगावी भजनी मंडळांसाठी लागणाऱ्या सतार, तंबोरा, तबला, डग्गा,



पखवाज, वीणा, हार्मोनियम, ताशा, ढोल, झांज, गिटार संबळ, हलगी, लेझीम, घुमका, झांज, टाळ, मृदंग ही वाद्ये मिरजेतील बाजारात मिळतात.

**मराठवाडा आणि विदर्भातही क्रेझ**

धनगरी ढोल मिरज परिसरात तयार होतात. पंढरपूर, आळंदी, पैठण यांसह अनेक तीर्थक्षेत्रांत मिरजेतून वाद्ये जातात. आता विधानसभा निवडणुकीमुळे विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तर व पश्चिम महाराष्ट्रातील विविध पक्षांच्या उमेदवारांकडून मिरजेतील वाद्य विक्रेत्यांकडे वाद्यांची मागणी आहे. यामुळे गणेशोत्सवानंतर निवडणुकीमुळे बाजारात उलाढाल असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

> एका मंडळाला ही वाद्ये देण्यासाठी सुमारे २५ हजार रुपये खर्च आहे. एका मतदारसंघात सुमारे ४० ते ५० मंडळांसाठी वाद्यांना दहा लाखांवर खर्च उमेदवार करीत आहेत. यामुळे वाद्य विक्रेत्यांना अच्छे दिन आले आहेत. राज्यातील विविध ठिकाणांवरून भजनी मंडळांसाठी मिरजेत वाद्यांच्या बाजारपेठेत मागणी असल्याने पुरवठा करण्याचे काम सुरू आहे.
>
> **- संजय मिरजकर, वाद्य विक्रेते.**

**दीडशे वर्षांची परंपरा**

सण उत्सवासाठी लागणारे वाद्य, तंतूवाद्य निर्मितीची दीडशे वर्षांची परंपरा असलेल्या मिरजेतील तंतूवाद्यांना देशभरातून मागणी आहे. तंतूवाद्यांसोबतच गणेशोत्सव, नवरात्रोत्सवासाठी वारकरी, भजनी मंडळे, वाद्य पथकांना लागणारी सर्व वाद्ये मिरजेत मिळतात.निवडणुकीच्या तोंडावर मतदारसंघातील गावोगावी भजनी मंडळांना देण्यासाठी वीणा, पखवाज, हार्मोनियम, तबला, डग्गा, संबळ, टाळ, ताशा, झांज ही वाद्ये मिरजेतून खरेदी करण्यात येत आहेत.




## मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल देणार बच्चू कडूंना धक्का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

मेळघाट विधानसभा मतदार संघाचे प्रहार जनशक्ती पक्षाचे विद्यमान आमदार राजकुमार पटेल सध्या बच्चू कडू यांना धक्का तयारीत असल्याचे आहे. उद्याला आ.पटेल यांनी कार्यकर्ताचा संवाद मेळावा आयोजित केला आहे त्या मेळाव्यासाठी जे बॅनर छापण्यात आले आहे त्या बॅनरवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा फोटो छापण्यात आला असून बच्चू कडू यांचा कुठेही उल्लेख किंवा फोटो ननसल्याचे बघावयास मिळत आहे त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर बच्चू कडू यांना धक्का बसण्याची शक्यता वर्तविल्या जात आहे.

## २८०० वाहनचालकांना दंड, तरीही नंबरप्लेटवर 'दादा, मामा'

### फॅन्सी नंबर प्लेट : वाहतूक शाखेकडून कार्यवाही मोहिमेला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अमरावती शहर वाहतूक पोलिसांनी गेल्या आठ महिन्यांत सुमारे २८०२ वाहनधारकांना ई-चालानने दंड ठोठावला. तरीही 'दादा', 'मामा', 'काका', 'भाऊ' अशा फॅन्सी नंबर प्लेटला लगाम बसलेला नाही. त्यामुळे आता पुन्हा एकदा वाहतूक पोलिस फॅन्सी नंबर प्लेटबाबत मोहीम हाती घेणार आहेत.

शहरातील काही वाहनधारक, विशेषतः राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आपल्या मोटारसायकल, कारवर 'दादा', 'मामा' नंबरप्लेट वापरतात. शहरातील साखळी चोरीच्या घटनांमध्येही बरेचदा दुचाकीवरील नंबर चटकन ओळखू येऊ नये म्हणून कलाकुसर करून नंबर टाकण्यात येत असल्याचे निरीक्षण पोलिसांनी नोंदविले आहे. त्यामुळे वाहतूक शाखेने यंदा २८०० च्या आसपास वाहनधारकांवर कारवाई करत ५०० पेक्षा अधिक वाहनांच्या फॅन्सी नंबर प्लेट काढून टाकल्या. 'नो- पार्किंग'मधून उचलून आणलेल्या गाड्यांमध्येदेखील अशी गाडी आढळल्यास त्यावरही कारवाई करण्यात येत आहे. शहरातील अनेक दुचाकींच्या मागील नंबर प्लेटवर 'बॉस', 'भाई', 'दादा', 'काका', 'मामा' अशी अक्षरे दिसतात. ही काही नातेवाइकांची नावे नाहीत,



**अशी झाली कारवाई**

| महिना | केसेस |
| --- | --- |
| जानेवारी | २६४ |
| फेब्रुवारी | ४२६ |
| मार्च | ३९६ |
| एप्रिल | २६४ |
| मे | ३७० |
| जून | ३५५ |
| जुलै | ४११ |
| ऑगस्ट | ३१६ |

तर या आहेत फॅन्सी नंबर प्लेट. फटफट आवाज करत असलेली बुलेट आणि तिच्यावर असलेली अशी नंबरप्लेट हे चित्र तुम्ही अनेकदा पाहिले असेल.

सध्या फॅन्सी नंबर प्लेटचे फॅड आले आहे. नंबर प्लेटवर कोणत्याही प्रकारचे सांकेतिक चिन्ह किंवा तत्सम गोष्टी लावणे नियमांच्या विरोधात आहे. त्याला दंडही ठोठावला जातो. मात्र, त्यानंतरही ते फॅड कमी झालेले नाही.

> जानेवारी ते ऑगस्ट दरम्यान विनाक्रमांकाच्या व फॅन्सी नंबर प्लेट असणाऱ्या २८०२ वाहनधारकांना दंड ठोठावण्यात आला. ऑगस्टअखेरपर्यंत ६२ हजार वाहनधारकांनी वाहतूक नियम मोडले. फॅन्सी नंबर प्लेट व विनाक्रमांकाच्या वाहनांवर कारवाईची मोहीम अधिक वेगाने करण्यात येईल.
>
> **- ज्योती विल्लेकर, वाहतूक पोलिस निरीक्षक**

# अमरावतीत परिस्थिती शांत १२०० जणांवर गुन्हा दाखल

## नागपुरी गेट पोलिस स्टेशनवर दगडफेकीनंतर पोलिसांची कडक कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

नागपूर गेट पोलिस ठाण्यात काल रात्री झालेल्या गोंधळानंतर आज परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. दगडफेक आणि वाहनांची तोडफोड केल्याप्रकरणी पोलिसांनी १२०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यापैकी २७ आरोपींची ओळख पटली आहे. अटकेची प्रक्रिया लवकरच सुरू होईल.

काल रात्री, सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (SDPI) चे काही सदस्य उत्तर प्रदेशातील एका धार्मिक नेत्याने दिलेल्या वादग्रस्त विधानाच्या निषेधार्थ नागपुरी गेट पोलीस ठाण्यात पोहोचले होते. दरम्यान, काही समाजकंटकांनी अचानक पोलिस स्टेशन आणि पोलिसांवर दगडफेक सुरू केली, जो सुमारे अर्धा तास सुरू होता.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तात्काळ अतिरिक्त फौजफाटा पाचारण करून जमावावर लाठीचार्ज व अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. यानंतर जमाव पांगला. या घटनेत पोलिसांनी दोन गुन्हे दाखल केले आहेत - पहिला डऊझख सचिवाच्या तक्रारीवरून हिंदू धार्मिक नेत्याविरुद्ध आणि दुसरा १०००-१२०० लोकांविरुद्ध दंगल आणि पोलिसांवर हल्ला केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलीस ठाण्यात जमा झाला दगडांचा ढीग**

काही समाजकंटकांनी शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास अचानक पोलिस स्टेशन आणि पोलिसांवर दगडफेक सुरू केली, जो सुमारे अर्धा तास सुरू होता.त्यामुळे पोलीस आवारात दगडांचा मोठ्या प्रमाणात ढीग जमा झाला आज सर्व दगड हे जमा करण्यात आले या वेळी गाड्यांचे हि मोठ्या प्रमाणात नुकसान येत आहे.

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

पोलीस ठाणे नागपुरी गेट परिसरात कलम १६३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (क. १४४ सी.आर.पी.सी.) प्रमाणे



जमावबंदी आदेश लागु करण्यात आला आहे. १) सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, कुठल्याही प्रकारचा जमाव जमवु नये तसेच कोणीही कोणत्याही प्रकारचे शस्त्र, लाठी-काठी जवळ बाळगुन संशयीतरित्या एकगठ्ठा फिरु नये.२) कायदा व सुव्यवस्था हाती घेण्याचा कोणीही प्रयत्न करु नये तसेच अफवांवर विश्वास ठेवु नये व पसरवु नये.३) पालकांनी आपल्या मुलांना विनाकारण घराबाहेर पाठवु नये व ते कोणत्याही प्रकारच्या असामाजिक तत्वांबरोबर सामाजिक सुव्यवस्था बिघडविण्यासाठी मदत करणार नाहीत याकडे लक्ष ठेवावे.४) पोलीस ठाणे परिसरात सध्या शांतता असुन ती बिघडविण्याचा कोणीही प्रयत्न करु नये, अन्यथा योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.५) अमरावती शहरातील इतर पो.स्टे. हद्दीतील नागरिकांनी नमुद सुचनेप्रमाणे आपल्या हद्दीतील कायदा व सुव्यवस्था बिघडु नये यासाठी दक्ष रहावे व कोणत्याही प्रकारच्या असामाजिक कृत्यात सहभागी होवु नये.

**पोलीस आयुक्त, अमरावती शहर**

# वाशीमच्या पोहरादेवी येथे पंतप्रधान मोदींनी घेतला नगारा वाजवण्याचा आनंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ वाशिम**

वाशीम जिल्ह्यातील श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे नंगारा वास्तू संग्रहालयाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ११.३० वाजता करण्यात आले. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी नगारा वाजवण्याचा मनमुराद आनंद घेतला. नंगारा भवनात पंतप्रधान मोदींसमारे बंजारा समाजाच्यावतीने परंपरागत नृत्य देखील सादर करण्यात आले. बंजारा नृत्य व संग्रहालयाचे मोदींनी अवलोकन केले.

वाशीम जिल्ह्यातील श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे नंगारा भवन हे भव्य संग्रहालय उभारण्यात आले आहे. या संग्रहालयाच्या लोकार्पण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वप्रथम नांदेड येथे विमानाने आगमन झाले. त्यानंतर ते हेलिकॉप्टरद्वारे पोहरादेवी येथे दाखल झाले. पोहरादेवी येथील मॉ जगदंबा देवीच्या मंदिराला भेट देऊन पंतप्रधान मोदींनी दर्शन घेतले. संत श्री सेवालाल महाराज, संत श्री रामराव महाराज यांच्या समाधीस्थळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी नतमस्तक झाले. नंगारा वास्तू संग्रहालयाचे नरेंद्र मोदींच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, पालकमंत्री संजय राठोड आदी उपस्थित होते.

बंजारा समाजाचे प्राचीन वाद्य नगारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्साहात वाजवला. यावेळी परंपरागत बंजारा समाजाच्या वेशभूषेत प्राचीन नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण नंगारा वास्तू संग्रहालयाचे सुक्ष्मपणे निरीक्षण केले. नंगारा भवनाचे भव्य दिव्य स्वरूप असून मोठी गॅलरी आहे. या भवनाची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. वास्तू संग्रहालय परिसरात बंजारा समाजाच्या प्राचीन वास्तूचे प्रदर्शन देखील भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाला सुद्धा नरेंद्र मोदी यांनी भेट देऊन पाहणी केली. नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीमुळे बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण आहे.

# गणोजाचे श्रीमहालक्ष्मी मंदिर भाविकांच्या गर्दीने फुलले

## नवरात्रोत्सवाला प्रारंभ : गुरुवारी सकाळी महाआरती, रात्री होमहवन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५भातकुली**

भातकुली येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र गणोजा देवी येथील श्रीमहालक्ष्मी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला असून भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसर फुलला आहे. मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली असून देवीला दागदागिने चढविण्यात आले आहे. यादरम्यान, श्रीमद भागवत कथेसह अष्टमीला सकाळी महाआरती, होमहवन इत्यादी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात देवीचे साडेतीन पीठ आहेत. कोल्हापूरची श्रीमहालक्ष्मी ही त्यापैकी एक पूर्ण पीठ आहे. या देवीच्या मूर्तीची प्रतिरूप मूर्ती भातकुली (जि. अमरावती) तालुक्यातील गणोजा येथे आहे. मूर्तिसाम्यामुळे येथील देवीला 'करवीर निवासिनी श्रीमहालक्ष्मी' म्हणून भाविक संबोधतात. गणोजा येथील मंदिरातील मूर्ती अखंड काळ्या पाषाणाची असून ती 'स्वयंभू' आहे. मूर्तीची उंची साधारणतः सव्वादोन फूट आहे. ती सिंहावर आरूढ असून चतुर्भुज आहे. देवीच्या हातात त्रिशूल, ढाल, गदा व पद्य आहे. मस्तकावर मुकुट आहे. गणोरी गावचे गणू भटजी हे कोल्हापूरच्या देवीचे निस्सीम भक्त होते. ते दरवर्षी नवरात्रोत्सवात कोल्हापूरला देवीच्या दर्शनाला अनवानी (पायी) जात असत. वर्षानुवर्षे त्यांच्या या वारीत कधीच खंड पडला नाही; मात्र वृद्धापकाळ आल्याने ते फार थकले होते. पुढल्या वर्षी देवीचे दर्शन होणार की नाही, या विवंचनेत ते मंदिराच्या आवारात निद्रिस्त असता त्यांना दृष्टांत झाला. 'गणू ऊठ ! पहाट झाली, गावाला निघायचे आहेना, लवकर आटप, मीच तुझ्या सोबतीला येते. पण, एक गोष्ट लक्षात ठेव. मागे वळून पाहू नको.' हे ऐकून गणूच्या मनात श्रद्धेच्या उर्मी जागृत झाल्या ते परतीच्या मार्गाने



निघाले. गाव जवळ आले असता त्यांच्या मनात शंका आली. खरंच महालक्ष्मी सोबतीला असेल का, असा प्रश्न त्याच्या मनात घोंघावला आणि त्यांनी पेढी नदीच्या पैलतिरावर जाऊन मागे वळून पाहिले. चमत्कार झाला... आश्चर्याचा धक्का बसला.. काळ्या पाषाणाची तेजस्वी मूर्ती त्यांना दिसली आणि ते नतमस्तक झाले. त्याच मूर्तीने त्यांना 'गणू जा!' असा आदेश दिला. यावरूनच या गावांचे नाव 'गणूजा'चे पुढे गणोजा (देवी) झाले, अशी आख्यायिका आहे.

सुमारे चारशे वर्षांपूर्वी गावाच्या पाटलांच्या स्वप्नात देवीची मूर्ती आली. नदीपात्रात असल्याचा दृष्टांत त्यांना झाला. त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने त्या जागेचे उत्खनन केले असता काळ्या पाषाणाची तेजस्वी मूर्ती सापडली. त्याच मूर्तीची मार्गशीर्ष पौर्णिमेच्या मुहूर्तावर शेकडो भाविकांच्या साक्षीने विधिवत् प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, अशीदेखील आख्यायिका आहे. मार्गशीर्ष पौर्णिमेला येथे यात्रोत्सवच असतो. दहा दिवस महोत्सवात तीर्थस्थापना अखंड बीणावादन, षोडशोपचार पूजा, अभिषेक, कीर्तन, हरिपाठ, भारुड, भागवतकथा, दहीहंडी, महाप्रसाद आदी धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येते. दरवर्षी आश्विन शुद्ध प्रतिपदेला मंदिरात घटस्थापना केली जाते. धार्मिक विधीने कलशपूजन करून दीपदेवतेची यथासांग पूजा करून नवरात्रोत्सवाला सुरुवात होते. नवरात्र व मार्गशीर्ष महिन्यातील यात्रोत्सवादरम्यान देवीला सोन्याचा अलंकृत मुखवटा व मढविलेले दागदागिने चढविले जातात. सुमारे अडीच हजार लोकसंख्या असलेले गणोजा गाव आडवळणावर असूनही, संतमहात्मे, देवदेवतांच्या पदस्पर्शाने ते पावन झालेले आहे. पुराणकाळी श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केल्यावर येथूनच ते दाढी-पेढी येथे गेल्याची दंतकथा आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी १९३५ साली दिव्य महायज्ञाचे आयोजन करून परमेश्वराला विश्वशांतीचे आवाहन केले होते. 'कर्मयोगी गाडगेबाबांचादेखील पदस्पर्श या भूमीला झाला. येथील महालक्ष्मी मंदिर उत्तर-दक्षिण अव्याहत वाहणाऱ्या पेढी नदी काठावर पूर्वाभिमुख उभे आहे. मंदिर परिसरात आम्रवृक्षासह इतरही वृक्षे आहेत. निसर्गराजीने नटलेल्या मंदिराच्या आग्नेय दिशेस एक किलोमीटर अंतरावर 'त्रिवेणी संगम' असून, त्याच्या तिरावर कळंब वृक्ष आहे. वर्षांत येणाऱ्या पर्वकाळी भाविक येथे स्नान करतात.

**अष्टमीला भाविकांच्या महाआरतीचे आयोजन**

नवरात्रोत्सवादरम्यान गणोजा परिसरातील भातकुली, सायत, कोलटेक, वासेवाडी, चाकुर, कानफोडी, दाढी-पेढी, बपोरी, सोनोरी, हिवरा अगदी विविध गावातील भाविक श्रध्देने मोठ्या संख्येने नऊ दिवस सकाळी पायदळ व वाहनाने देवीच्या दर्शनाला येतात. या भाविकांनीच एकत्र येऊन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अष्टमीला गुरुवारी (ता.१०) सकाळी सहा वाजता महाआरती व सुखामेव्याच्या प्रसादाच्या वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. महाआरतीचे हे पंधरावे वर्ष आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने राहण्याचे आवाहन श्रीमहालक्ष्मी भाविक मित्र मंडळाने केले आहे.

# महायुतीच्या काळात महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास हे प्रगतीचे द्योतक

## भाजपा नेते डॉ. अनिल बोंडे यांची पत्रकार परिषदेत माहिती : जिल्ह्यात महासंपर्क अभियानाला थाटात प्रारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

महायुतीच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होत आहे. लाडकी बहीण, शेतकरी, युवा, समाजातील विविध वर्ग, समाज घटक यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून महाराष्ट्राची मजबुतीने वाटचाल सुरू आहे, हे राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या प्रगतीचं द्योतक आहे, असे प्रतिपादन भाजप जिल्हाध्यक्ष खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी येथे केले.शासकीय विश्रामगृह येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत जिल्ह्यात भाजप तर्फे महासंपर्क अभियानाला थाटात सुरुवात झाल्याची माहिती दिली. भाजपा अमरावती ग्रामीण तर्फे आयोजित पत्रकार परिषदेला आमदार प्रताप अडसड, माजी आमदार रमेश बुंदिले, केवलराम काळे, प्रभुदास भिलावेकर, दिनेश सूर्यवंशी किरणताई महल्ले, राजेश वानखडे, अनिता तिखिले, रविराज देशमुख, महामंत्री नितीन गुडधे, विवेक गुल्हाने, मनोहर लेवटे, सुखदेव पवार, संजय घुलक्ष्ये, प्रवीण तायडे, विलास कविटकर, रमेश मावस्कर, रावसाहेब रोठे, रेखा मावसकर, नकुल सोनटक्के, अजिंक्य वानखडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी माहिती देताना भाजप नेते अनिल बोंडे म्हणाले की, आगामी विधानसभा निवडणुकीत न भूतो न भविष्यती यश गाठण्यासाठी भाजप सज्ज झालेली आहे. भाजप तर्फे जिल्ह्यात महासंपर्क अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. शक्ती केंद्रांवर बैठका, बूथ चे नियोजन करणे, प्रत्येक बुथवर बैठका घेऊन भाजपला संघटनात्मक दृष्ट्या मजबूत करणे, घर चलो अभियान इत्यादी कार्यक्रम जिल्ह्याच्या चौदाही तालुक्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती डॉ. अनिल बोंडे यांनी दिली. ते म्हणाले की, लाडक्या बहिणींना महायुतीच्या सरकारनं चांगला निर्णय घेऊन बळ दिल आहे. त्या अनुषंगाने भाजपने जिल्ह्यात आतापर्यंत ३९ लाडक्या बहिणींचे मिळावे घेतले. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. एक लाख लाडक्या बहिणीपर्यंत भाजप पोहचली आहे. सरकारने मानधन दिल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव आहेत. प्रत्येक समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न भाजप तर्फे सुरू आहे. सारथी-बार्टीतीच्या धरतीवर अनेक महापुरुषांच्या नावाने महायुती सरकारने महामंडळ निर्माण केली आहेत. खाटीक समाज महामंडळ, बारी समाज महामंडळ, तेली समाज महामंडळ, मत्स्य महामंडळ, काशीबा आर्थिक विकास महामंडळ इत्यादींचा त्यामध्ये समावेश आहे. प्रत्येक समाजाला मुबलक रोजगार मिळावा. तरुण-तरुणाईच्या कौशल्याला पाठबळ मिळावे यासाठी सर्व समाज घटकांचा विचार लक्षात घेऊन महायुती सरकारची वाटचाल सुरू आहे. निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने महा सभासद अभियानाला देखील सुरुवात केलेली आहे. भाजप हा कार्यकर्त्याला प्राधान्य देणारा पक्ष आहे. राष्ट्राच्या आणि देशाच्या उन्नतीसाठी झटणारा भाजप पक्ष आहे. त्यामुळे ही भावना जगाच्या पातळीवर एकमेव भाजप पक्षात असल्याचे देखील त्यांनी नमूद केले. पत्रकार परिषदेचे प्रास्ताविक भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांनी केले.

### ४ ऑक्टोंबर पासून जिल्ह्यात अभियान सुरु

भाजप तर्फे जिल्ह्यात ४ ऑक्टोंबर पासून महासंपर्क अभियान सुरू झाले आहे. मंडळ प्रभारी यांना सोबत घेऊन बुथचे नियोजन करणे, शक्ती केंद्रांवर बैठका घेणे, प्रत्येक बूथभर बैठका घेणे, बुथ पालक नियुक्त करणे, मतदार याद्या पोहोचवणे, बचत गटांच्या बैठकी घेणे, आजी-माजी पदाधिकाऱ्यांची संमेलन घेणे, प्रत्येक बुथ मधील लाभार्थ्यांची यादी तयार करणे, प्रत्येक नागरिकांशी संपर्क करणे, प्रभावी मतदार त्यांची संपर्क करणे यासह अन्य कार्यक्रम भाजपच्या महासंपर्क अभियानादरम्यान राबविले जात आहेत. चार ते सहा ऑक्टोबर या काळात शक्ती केंद्रांवर बैठका, ६ ते ७ ऑक्टोबर पर्यंत महाजन संपर्क अभियान, १० ऑक्टोबर पासून प्रत्येक बूथ वर बूथनिहाय बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत अशी माहिती देखील अनिल बोंडे यांनी दिली.

# महिन्याचे व्याज १० टक्के; ही अशी कसली सावकारी?

## व्याज भरताना येतात मेटाकुटीला : कायद्यामुळे आले नियंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अडचणीच्या वेळी बँकेपेक्षा कमी वेळात पैसे मिळतात म्हणून खासगी सावकारांचा अनेक जण आधार घेतात. मात्र, तेच या व्याजाने पैसे घेणाऱ्यांना अनेकदा अडचणीत आणतात. पैसे तर मिळतात; पण भरमसाठ व्याज आकारले जाते आणि ते व्याज भरता-भरता अनेक जण मेटाकुटीला येतात. काही जण तर अगदी महिन्याला १०-१२ टक्के व्याज आकारत असल्याने ही असली सावकारी कसली, असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित होतो. सावकारांकडून गरजवंतांना तत्काळ पैसे मिळत असले तरी सावकार अवाच्या सव्वा व्याज लावतात. ते देणे अनेकांना शक्य होत नाही, तर ते देताना अनेकांचे पैशांचे गणित बिघडते. मात्र, राज्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या सावकारांच्या जबरदस्तीला आता लगाम लागला आहे. नोंदणीकृत सावकार किती टक्क्यांनी व्याज घेऊ शकतो, यासाठी निर्बंध घालण्यात आलेले आहेत.

**तक्रार कुठे कराल?**

सावकारीतून जमीन बळकावली गेली असल्यास शेतकरी त्याची तक्रार तालुका स्तरावर सहायक निबंधक यांच्याकडे करतात. त्यात सावकारीचे प्रकरण आढळून आले, तर त्याची सुनावणी ही जिल्हा उपनिबंधक यांच्या स्तरावर केली जाते, तसेच पोलिस प्रशासनाकडेही तक्रार करू शकतात.

**सावधान, खासगी सावकारी कराल तर लागेल मोक्का**

कोणताही परवाना नसताना सावकारी व्यवसाय चालविणारे अनेक जण आहेत. वैयक्तिक पातळीवर व्यवसाय चालत असून मागणीप्रमाणे पैसे पुरविले जातात; परंतु असा प्रकार उघडकीस आल्यास मोक्कांतर्गत कारवाईला सामोरे जावे लागू शकते. तसेच पाच वर्षांपर्यंत शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे.